# माणूस

शनिवार । १५ मार्च १९८० । ७५ पैसे

हे भयानक आर्थिक मागासलेपण, ऐतिहासिक काळापासून असमियांच्या मनात निर्माण झालेला न्यूनगंड, असमिया-बंगाली संघर्ष, आणि स्वार्थी राज्यकर्त्यांनी सतत दुर्लक्षिल्याने वाढत गेलेली आणि आज भीषण बनलेली परदेशी घुसखोरांची समस्या ही सारी आसामातील सध्याच्या आंदोलनाची पार्श्वभूमी आहे.

## अस्वस्थ आसाम

लेखांक दुसरा

पृष्ठ ५

## शिवाय....

कम्युनिस्ट जगाचा एकच पोप असू शकतो. जेव्हा बेलग्रेडमध्ये कॉमिन्फॉर्म स्थापन होऊन त्याचे नेतृत्व मार्शल टिटोने स्वतःकडे घेतले तेव्हा स्टॅलिन बिथरला व परिस्थिती चिघळली

**मार्शल टिटो....** ( पष्ठ ९ )

# सप्रेम नमस्कार

¤ डॉ. शरद अभ्यंकर यांच्या लेखावर उलटसुलट चर्चा होत आहे. कृती नाही बडबड फार अशा देशात आणखी होणार तरी काय? अंधश्रद्धा, संदर्भ गमावून बसलेले अर्थशून्य संस्कार, यांना घट्ट मिठी मारून बसणारे आपण जरासुद्धा बदलणार नाही. ही परिस्थिती सुशिक्षितांची आहे तर मग अशिक्षितांचे काय? एक बोलके उदाहरण देतो.

बाबुलनाथ (मुंबईतील बडयांची वस्ती) येथे राहणारे मराठी कुटुंब. कारने येताना वाटेत वडाळयाचे विठोबामंदिर लागले. एकादशीनिमित्त भाविकांची तोबा गर्दी पाहून मुंबईतील पहिल्या दर्जाच्या कॉन्व्हेंटमध्ये शिकणारे चिरंजीव वडिलांना विचारतात, 'पपा, व्हाय सो मच रश इन 'टेम्पल ऑफ गॉड?' पपा 'टेम्पल ऑफ गॉड' म्हणू नकोस असे सांगतात. ह्या चिरंजिवांची मुंज पपा-ममींनी नवीन पितांबर-कद घेऊन साग्रसंगीत केली. 'हो काही परंपरेप्रमाणे उणीव नको रहायला' अशी वर मल्लीनाथी.

शेवटी खरे काय तर पोटासाठी TIFR मध्ये शास्त्रज्ञ असा किंवा कॉलेजमध्ये विज्ञान शिकवीत असा; तो कप्पा वेगळा आणि दिसणाऱ्या शेंदूर लागलेल्या दगडापुढे डोके टेकण्याचा कप्पा वेगळा. 'मनाला कित्ती कित्ती शांत वाटते अशा वेळी.' 'ह्या टेन्शनच्या काळात मन कसे शांत हवे हो' हे वर समर्थन.

जाऊ द्या, ज्याला जे हवे ते त्याने करावे. उगीच विज्ञाननिष्ठा, विज्ञाननिष्ठ समाजरचना ही भाकडकथा हवी आहे कोणाला? आम्हाला हव्यात खुंटचा. आमची असमर्थता आणि पराक्रमशून्यता टांगण्यासाठी, लपविण्यासाठी. आम्हाला हवा एक नेता, जो आमचे पोटाचे प्रश्न सोडवील. आम्हाला हवा एक बुवा जो आम्हाला साऱ्या आधी-व्याधींतून सोडवील. त्यालाच साकडे घालू या म्हणजे सारे सारे प्रश्न सुटतील. यक्षिणीच्या कांडीसारखी चीज हवी आहे आम्हाला. आहे का कोणाजवळ? आम्ही तयार आहोत आमच्या साऱ्या निष्ठा त्याच्या चरणांजवळ वाहण्यासाठी. आहे का कोणी, जो आम्हाला देईल विनासायास नोकरी, प्रमोशन, पुत्रप्राप्ती, पाच लाखांचे लॉटरीचे बक्षीस आणि सारे काही? सापडेल एखादा परीस जो दूर करील आमची सारी चिंता? चला उठा आणि दिसणाऱ्या प्रत्येक बाबाला गाठा! त्यातच आढळेल एखादा मुक्तिदाता!

१५ फेब्रुवारी — चंद्रशेखर राजे, डोंबिवली

¤ आपल्या दि. १६ फेब्रुवारी ८० च्या अंकात नारायणपूरमधील अत्याचारांबद्दलचे मतप्रदर्शन वाचले. नारायणपूर येथील महिलांवर झालेले अत्याचार केव्हाही गर्हणीय आहेत, माणुसकीच्या नावाला काळिमा फासणारे आहेत.

परंतु त्याच वेळी महाराष्ट्रातील एकाही स्त्रीसंघटनेने नारायणपूर येथील घटनेचा निषेध केला नाही याबद्दल आपण खेद व्यक्त केला आहे. हे आपले खेदप्रदर्शन निश्चित बरोबर नाही.

महाराष्ट्रातून लोकसभेवर निवडून गेलेल्या एकमेव महिला खासदार सौ. प्रमिला दंडवते यांनी या घटनेचा जाहीर निषेध तर केलाच; शिवाय इंदिरा गांधींच्या नारायणपूर-भेटीने स्त्रीच्या अब्रूचे राजकीय भांडवल केल्याबद्दल त्यांचा निषेध करणारे पत्र लिहिले होते व त्या पत्राला सर्व प्रमुख वर्तमानपत्रांतून प्रसिद्धीही मिळाली होती.

तसेच दि. १३ फेब्रुवारी रोजी 'जनता महिला आघाडी' तर्फे दादरला घेण्यात आलेल्या सभेमध्ये नारायणपूरच्या अत्याचारांचा व पाशवी शक्तींचा निषेध करणारा ठराव संमत झाला.

नारायणपूरच्या अत्याचारांबद्दल आपण फार कळवळयाने लिहिलेत, दलित आणि अल्पसंख्यांकांबद्दल आपण योग्य त्या भावना दर्शविता. पण...

आंध्रात ऑक्टोबर ७८ मध्ये दोन मुस्लिम स्त्रिया, खैरुन्निसा व रझियाबी यांच्यावर पोलिसांकडून पाशवी अत्याचार झाले, त्यामुळे एक स्त्री मरण पावली. त्या वेळी इंदिरा गांधींनी तिथे नारायणपूर इतक्याच तातडीने भेट का दिली नाही? बेलछी अत्याचारांच्यानंतर हत्तीवरून दुःखितांची आसवे पुसायला गेलेल्या इंदिराबाई, महाराष्ट्रात त्यांचेच वसंतराव नाईक मुख्यमंत्रिपदावर असताना गवईबंधूंचे डोळे काढण्यात आले तेव्हा जातीने चौकशीला का आल्या नाहीत?

१९ फेब्रुवारी — सुधीर राऊत, मुंबई

¤ दि. २ फेब्रुवारीच्या अंकात 'केरळ : इंदिरा लाट अडविता येते' हा श्री. वा. दा.


**साप्ताहिक माणूस**

**वर्ष : एकोणिसावे**
**अंक : बेचाळीसावा**
**१५ मार्च १९८०**
**किंमत : ७५ पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी ।
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
**१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९**

रानडे यांचा लेख वाचला. विरोधकांच्या एकजुटीने इंदिरा काँग्रेसला हटविता येते असा या लेखाचा एकूण अर्थ आहे. फक्त त्यात जनता पक्ष इंदिरा काँग्रेसच्या 'आघाडीत ठेवून' अशी पुस्ती जोडली पाहिजे. कारण केरळात लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकांच्या वेळी इतरत्र एकाधिकारशाही विरोधाचे ढोल बडविणाऱ्या जनता पक्षाने इंदिरा काँग्रेसशी सोयरिक केली होती व एकत्र प्रचारही सर्वत्र होत होता, ही वस्तुस्थिती नजरेआड करू नये. निदान श्री. रानडे यांच्यासारख्या एके काळच्या मार्क्सवादी विचारांच्या व्यक्तींनी तरी. केरळप्रमाणे बंगालमध्येही इंदिरा काँग्रेसबरोबर तडजोड करण्याचे सतत प्रयत्न जनता पक्षाच्या राज्यनेतृत्वाकडून होत असतात. म्हणजेच जेथे डावी आघाडी जोर करते तेथे जनता पक्ष इंदिरा काँग्रेसकडे झुकतो. हे पक्षाच्या वर्गप्रतिमेचे तर द्योतक नाही ना ? अर्थात इंदिरा गांधींच्या तडफदार नेतृत्वाला रा. स्व. संघाच्या संघटनेची जोड मिळाली तर किती किती छाऽऽन होईल, अशा आशयाची पत्रं आपण प्रसिद्ध केली आहेतच; त्यामुळे यात नवल वाटण्याचे कारण नाही.

२ फेब्रुवारी ८० — **भालचंद्र राजे**, कल्याण

---

# संध्याकाळचे पुणे

**दि. बा. मोकाशी**

## ते कोण की दुर्मती ?

निवडणूक हरल्यानंतर आज बहुधा प्रथम श्री. ना. ग. गोरे यांनी जाहीर भाषणात बोलता बोलता सहजपणे आपण निवडणूक का हरलो ते सांगितले.

ते पुण्यातील मॉडर्न कॉलेजच्या दशवार्षिक समारोहात अध्यक्षपदावरून बोलत होते. एकोणीसशेसत्तर साली सुरू झालेल्या या महाविद्यालयाला आज दि. ४-२-८० या दिवशी दहा वर्षे पुरी झाली. या समारोहाचे प्रमुख पाहुणे श्री. एन. के. फिरोदिया होते. व्यासपीठ रंगीत झालरी व झेंडूच्या माळांनी नक्षी करून सुशोभित केले होते. महाविद्यालयाच्या इमारतीवर विद्युतदिव्यांच्या माळा सोडल्या होत्या. व्यासपीठासमोरील प्रांगणात श्रोत्यांसाठी खुर्च्या मांडल्या होत्या. पुढच्या काही रांगांवर निमंत्रित बसले होते; पण बहुसंख्य श्रोते विद्यार्थी होते.

आपल्या प्रास्ताविकात प्राचार्य गंभीर म्हणाले, 'इतर महाविद्यालयांच्या वेगवेगळ्या ज्युबिली झाल्या. आमची ज्युबिली नव्हे; पण आमचा दशवार्षिक समारोह यावा हेही महत्त्वाचे आहे. आज पस्तीसशे विद्यार्थी येथे शिकताहेत. त्यांनी शिक्षणाची उत्कृष्ट परंपरा राखली आहे.' अनेकांच्या सहाय्याने हे महाविद्यालय उभे राहिले, हे सांगताना ते म्हणाले 'दर महिन्यास प्रत्येक प्राध्यापकाने वीस रुपये देऊन पंच्याहत्तर हजार रुपये महाविद्यालयास दिले.'

नंतर प्रसिद्ध उद्योगपति व समारोहाचे प्रमुख पाहुणे श्री. एन्. के. फिरोदिया यांचे भाषण झाले. ते म्हणाले, 'समारंभात परखड बोलणं अनुचित व अवघड. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर एक सतत घोष, की या देशातून मिडल मॅन काढून टाका ! गिऱ्हाईक व उत्पादक यातला कॉमर्स हा दुवा आहे. आमचे शासन व पुढारी १९४७ सालापासून मिडल मॅन काढा ही घोषणा देत असताही १९४७ पेक्षा आज तीसपट कॉमर्सचे विद्यार्थी वाढले हे गौडबंगाल काय आहे ? जर सरकारला व पुढाऱ्यांना मिडल मॅन नको असेल तर ही वाढ का ? जर एम. एल्. ए. ने जाऊन मंत्र्यांना आग्रह केला की आमच्या गावाला कॉलेज द्या की दिले. असे झाले असेल तर देशाच्या दृष्टीने हे युक्त आहे का ? आज एवढी मुले कॉमर्सला जातात ती प्रॅक्टिकल नसतं म्हणून का ? पेपर लिहिले की झाले. कॉमर्सचा विद्यार्थी व्यापारी माणूस आहे. हा जर उत्पादक व गिऱ्हाईक यामधला दुवा असला तर त्या दृष्टीने शिक्षण घेतले पाहिजे. कॉमर्सच्या अभ्यासक्रमात काय आहे याचा त्या दृष्टीने विचार हवा. वितरणाचा विषय घ्या. त्याला वितरण करावयाच्या गोष्टींची खोल माहिती हवी. जर कापडव्यापार करावयाचा असेल तर त्याला कापडाच्या ताग्याची घडी कशी करावयाची हे ठाऊक हवं. गिऱ्हाइकाला कोणता माल आधी, कोणता माल नंतर दाखवावयाचा हे कळायला हवं. या गोष्टी ठाऊक नसतील, बाजारपेठा ठाऊक नसतील तर तो काय करणार ? सर्व धंदे आता सरकारी होणार असले तर मात्र या कुठल्याच ज्ञानाची आवश्यकता नाही. कारण मग गिऱ्हाईक गरजू होते. तुम्हा विद्यार्थ्यांना विचारतो तुम्ही का हा कोर्स घेतला ?'

¤

फिरोदियासेठ ! विद्यार्थ्यांच्या वतीने मी उत्तर दिलेले चालत असेल तर देतो. विद्यार्थी कॉमर्सला जातो तो बँकेत नोकरी मिळविण्यासाठी जातो. तुम्ही, व्यापारी व बँकेतला किंवा लाइफ इन्शुअरन्समधील क्लार्क याची गल्लत करू नका. तिथले पगार

तुम्हाला ठाऊक आहेत ना ? आमच्या कॉमर्संच्या विद्यार्थ्यांना तुम्ही कापडाच्या ताग्याची घडी करायला सांगता ? काय, आमच्या विद्यार्थ्याने पातळाच्या घड्या मोडून दाखवावयाच्या व एक बाई पन्नास पातळे पाहून एकही पातळ न पाहता गेली की, कपाळाला एकही अढी न घालता हसत मुख ठेवावयाचे? मीच विचारतो तुम्हाला फिरोदियासेठ ! आमचे काय करावयाचे तुम्ही ठरविले आहे? सेठजी, लग्नाच्या बाजारात आज बँक किंवा एल. आय. सी. मधील भाव डॉक्टर मुलाच्या खाली पण एंजिनियर मुलाच्या वर गेला आहे हे लक्षात ठेवा ! जर तुमच्या राज्यात तुम्ही आम्हाला पातळाच्या घड्या करायला लावणार असाल तर ते करूनच पहा! कॉमर्सकडे एकही मुलगा जाणार नाही. सगळी कॉलेजे ओस पडतील. मग कितीही एम्. एल. ए. कितीही मंत्र्यांना कितीही ठिकाणी कॉलेजे काढण्याच्या भरीस घालोत.

¤

विद्यार्थ्यांना पारितोषिकवितरण करून झाल्यावर ना. ग. गोरे यांचे समारोपाचे अध्यक्षीय भाषण झाले. व्यासपीठावर प्राचार्य गंभीर, स्वतः ना. ग. गोरे, एन. के. फिरोदिया, रँगलर महाजनी, वि. शं. गोखले, न. गो. सुरू व इंजिनियर मायदेव होते, ना. ग. गोरे पूर्वीच्या आठवणी सांगत म्हणाले, ' पुन्हा एकदा कॉलेजच्या परिसरात येण्याची संधी दिल्याबद्दल आनंद वाटतो आहे. तरुण महाजनी रॅकेट हातात घेऊन सायकलवरून फर्ग्युसन कॉलेजच्या उतारावरून जोरात येत असलेले मला आठवतात. शंकरशेट शिष्यवृत्ती मिळवलेले प्रा. सुरू आम्हाला आदर्श होते. त्यांची वाणी रसाळ, ज्ञान सखोल आणि विद्यार्थ्यांत मिसळत असल्याने ते लोकप्रिय होते.'

आधी झालेल्या बक्षीससमारंभास उद्देशून ना. ग. म्हणाले, ' फार मोठ्ठी गुणाची मुले पाहिली. (हंशा) फार आनंद झाला. फिरोदिया मार्मिक बोलले. त्यांनी म्हटले, ' आपण राजकारणाला स्पर्श करणार नाही. त्यांनी स्पर्श केला नाही. धक्का दिला. (हंशा) ते व्यापारी, मी राजकारणी. कोणत्याही क्षेत्रात ध्येयवादी निष्ठावंत, अभ्यासू माणसं असल्याशिवाय उपयोग नाही. फिरोदियांनी हे वेगळेपण दाखविले. तुम्ही ईर्षा धरून आणखी काही करून दाखवा.

१९४७ सालापासून ३० पट कॉमर्स विद्यार्थी वाढले—१९४७ सालापासून अनेक सरकारे आली. ते कोणत्या सरकारबद्दल बोलत होते कुणास ठाऊक ? सरकार कोणतेही येवो. सर्वांच्या हातून चुका झाल्या तरी सत्तेचाळीस सालापासूनच्या तेहतीस वर्षात हिंदुस्तानची प्रगती कुणाला नाकारता येणार नाही. स्वातंत्र्य मिळाल्यामुळेच हा उद्योग वाढला ही गोष्ट निर्विवाद. हिंदुस्तान हे विकसनशील राष्ट्रात पहिल्या नंबरचे राष्ट्र आहे. या इतर विकसनशील राष्ट्रातून मागणी येते, तुमचे यंत्रज्ञ–तंत्रज्ञ पाठवा. नायजेरियात तीनशे रेल्वेइंजिनिअर्स धाडले आणि वर्षांत आपल्या एंजिनिअर्सनी त्यांची आगगाडी रुळावर ठेवून धावती केली. मी विरोधी पक्षातला असून हे सांगतो. आपल्याला जमत नाही हा गंड नको. अमेरिकेलासुद्धा भारताचा विचार करावा लागतो. याचे श्रेय सर्वांना आहे. मी विद्यार्थ्यांना सांगेन ही प्रगती चालू राहील असे करा ! '

¤

गेले वर्षभर मी ' संध्याकाळचे पुणे ' हे सदर लिहितो आहे. त्या निमित्ताने मी शंभरएक व्याख्याने, परिसंवाद ऐकले. एक चमत्कारिक गोष्ट माझ्या लक्षात आली आहे. भावनेच्या आवाहनांनी तरुणपिढी मुळीच हलत नाही. विशेषतः राष्ट्र, समाज, मानवता असल्या विषयांना जिथे पूर्वी टाळ्या पडल्या असत्या, तिथे टिचकी वाजते. (बोअर झाल्याची) एखादा समारंभ किंवा सभा संपली की, लोक हलू लागतात आणि कोपऱ्यातून एखादा चिरका आवाज ' भारतमाता की जय ' ओरडतो. लोक त्या दिशेला पाहतात फक्त.

ना. ग. गोरे यांच्या भाषणातला आफ्रिकेत आपले इंजिनिअर जाऊन रेल्वे बांधण्याचा प्रसंग—त्याला पूर्वी नक्की टाळ्या पडल्या असत्या; पण विद्यार्थी अशा प्रसंगाचे वेळी आपापसात बोलत होते व एखादी लहानशी हास्याची लकेर उमटत होती, ती वक्त्यापर्यंत जात नव्हती; पण त्यांच्यात बसणाऱ्यांना कळत होते की, मुलांना देशभक्ती, कर्तव्य वगैरे विषयांनी हेलकावल्यासारखे होत नाही. ही केवळ मॉडर्नच्या मुलांची मनःस्थिती नव्हे. मला सर्वच मुलांच्या बाबतीत हा अनुभव आला. एकदा मी काही मुलांना आश्चर्याने विचारले की, जर राष्ट्र, समाज, परमेश्वर, धर्म कशासाठीच जगायचे नसेल तर कशासाठी जगायचे ? मुलांच्या मतांनी, जास्त जास्त पैसे मिळवायचे, जास्तीत जास्त सुखसोयी मिळवायच्या यासाठी. भौतिक गोष्टीपलीकडे त्यांचा विश्वास नव्हता. चढाओढीत पुढे राहावयाचे. पुनर्जन्म नाही, परमेश्वर नाही. जीवन या एका आयुष्यापुरतेच आहे, असे त्यांना प्रामाणिकपणे वाटत होते. मी या पिढीला ' सांप्रत ' पिढी किंवा देशधर्मातीत पिढी म्हणतो.

त्यामुळेच हल्ली पूर्वीच्या तऱ्हेच्या वक्तृत्वाचा परिणाम होत नाही. भावना चढवीत चढवीत शेवटी संदेशाचा फटका देण्याची एक पद्धत होती. दुसऱ्या पद्धतीत व्याख्यानाच्या शेवटी जीवनाविषयीचे गंभीर तत्त्वज्ञान सांगून श्रोत्यांना अंतर्मुख करावयाचे असे पूर्वी या तऱ्हेच्या वक्तृत्वांनी श्रोते घायाळ होत. तो काळ गेला हे लक्षात येत होते. गोरे यांचे काही सांगणे त्यांना बोअर होत होते, काही विचित्र वाटत होते, त्यांची काही ठिकाणची वाक्ये मुलांना कळत नव्हती, हे सर्व मुलांमध्ये जी किंचित (आम्हाला अकारण वाटणारी) खसखस पिकत होती व जिथे टाळ्या देण्यास हव्या होत्या तिथे ती देत नव्हती यावरून कळत होते. एकूण पाहता मुलं उत्तम वागली, तशी कुठलीच गडबड त्यांनी केली नाही. व्याख्यानाचे मी लहानसहान बारकावे सांगितले इतकेच.

¤

जीवन कसे बदलले आहे हे सांगताना साखरकारखान्यांची उपमा देऊन गोरे म्हणाले, ' हिंदुस्थानची साखर बनत असता, मळीची दुर्गंधीही तयार होत आहे. झोपडपट्ट्या, जुगाराचे अड्डे, दारूगाळचाचे अड्डे वगैरे ही ती मळी. या मळीत जाणार कोण ? त्यांना समपातळीत आणणार कोण ?'

सगळा समाज कसा बदलला आहे हे सांगून ते स्वतःच्या निवडणुकीतील स्वतःच्या अपयशाबद्दल म्हणाले, ' निवडणुकीला उभे राहा असा मित्रांनी आग्रह धरला. तेव्हाच मी मित्रांना म्हटलं, ' मला निवडणुकीत यश येणार नाही. मला उभं करू नका. माझं सर्व

आयुष्य पुण्यात गेलंय; पण पुण्याच्या भोवतालची मंडळी मला ओळखत नाहीत. ही माणसं फक्त जीवन जगतात. त्यांना विचार नाही. माझ्यात व त्यांच्यात संवाद नाही. मला उभं करू नका!' ना. ग. गोरे यांचे हे निवडणुकीनंतरचे बहुधा पहिलेच भाषण होते.

ना. ग. गोरे पुढे म्हणाले, 'अत्याचार, जाळणे वगैरेबद्दल वाचताना तुमच्या मनात खळबळ होते का? हा समाज असा कसा झाला? विकृत्या उफाळून येतात हे हिंदुस्तानच्या बदलण्याच्या प्रक्रियेतलं अपरिहार्य अंग आहे का?'

कॉमर्सबद्दल ते म्हणाले, 'वेगवेगळ्या प्रदेशांतून आलेल्या तांदुळाच्या पोत्यांतून एकाच तऱ्हेचे खडे येतात, हा सुद्धा कॉमर्सच. तेव्हा व्यापार हा वाईट व चांगला दोन्ही असतो. तुम्ही कोणता व्यापार करणार? तुमच्या या महाविद्यालयात तुम्हाला चांगला व्यापार शिकवितात अशी आशा आहे.'

माणसं किती वाईट होत चालली आहेत याचं त्यांनी काही तासांपूर्वीचं घडलेलं उदाहरण दिलं. ते म्हणाले, 'मला आज दुपारी फोन आला,' नानासाहेब आहेत का?' मी म्हटल, 'मी नानासाहेब बोलतोय.' तेव्हा फोनवरचा आवाज म्हणाला, 'मॉडर्न कॉलेजचे प्राचार्य गंभीर यांच्यातर्फे मी फोन करताय. संध्याकाळी मॉडर्न कॉलेजचा दशवार्षिक समारंभ होता. तो कॅन्सल झालाय. मॉडर्न कॉलेजचे एक प्राध्यापक वारले आहेत.' 'मी म्हटलं, वाईट झालं. समारंभ रद्द केलात ते योग्यच!' फोन खाली ठेवून, आता आपल्याला समारंभास जावयाचे नाही म्हणून स्वस्थ बसलो. संध्याकाळी सहा वाजता पुन्हा फोन आला, 'नानासाहेब! मी मॉडर्न कॉलेजवरून बोलतोय. आपण तयार आहात ना? साडेसहाला समारंभ आहे. मी गाडी धाडतो!' मी म्हटलं, 'अहो! पण समारंभ कॅन्सल झाला ना?' फोनवर उत्तर आलं. 'कुणी सांगितलं तुम्हाला?' मी म्हटलं, 'दुपारी मला असा फोन आला.'

काही तासांपूर्वीच घडलेला हा प्रसंग सांगून ना. ग. गोरे म्हणाले, 'तुम्ही तरुण मंडळी विचार करा. प्रोफेसर वारले, समारंभ रद्द झाला हा खोटा फोन करणारास तुम्ही कोणत्या वर्गात घालाल? एक संस्कृत सुभाषित आहे. (ना. ग. गोरे यांनी इथे संस्कृत सुभाषित म्हणून दाखवले; पण ते न देता वामन पंडितांनी त्याचा केलेला मराठी श्लोक मी देतो.)

हे तो सत्पुरुष स्वकार्य त्यजिती, अन्यार्थही साधिती॥

हे तो मध्यम जे निजार्थ करुनी अन्यार्थ संपादिती॥

हे तो राक्षस जे स्वकार्यविषयी अन्यार्थ विध्वंसिती॥

जे का व्यर्थ परार्थ हानि करिती ते कोण की दुर्मती॥

हे सुभाषित सांगून ना. ग. गोरे म्हणाले, 'ज्या कुणी हा फोन केला असेल त्याला काय म्हणावं—हे मला कळत नाही. त्या समारंभाला मी न जाऊन त्याला काय मिळणार होतं? हा वैरी कुणाचा? माझा की तुमचा की समाजाचा? समाजात अशा तऱ्हेची विकृति निर्माण झाली आहे. एका फार विचित्र अवस्थेतून मानवसमाज चालला आहे. काय करावयाचं या जगाचं? लंडनला तेच. शिकागोला तेच. मी अमेरिकेत पाहिलं, शिकागोमधे संध्याकाळी पाचनंतर पुरुषाला सुद्धा रस्त्यावर फिरता येत नाही. पाश्चात्य जगातही फार बिघाड आहे. हा जागतिक प्रश्न झाला आहे. हिंदुस्तानने तो आपल्या पद्धतीने सोडविला पाहिजे. परिस्थितीनं दिलेलं हे आव्हान आहे!'

गोरे यांच्या व्याख्यानात एक लहानशी गोष्ट लक्षात आली. ते कधीही भारत म्हणत नव्हते. ते हिंदुस्तान हा शब्द वापरीत होते. ही जुन्या पिढीची सवय असावी. निवडणुकीतील पराभवानंतर गोरे काय सांगणार याचे कुतूहल होते. सरळ तो विषय ते काढतील ही मात्र कल्पना नव्हती. असो. यानंतर वंदे मातरम होऊन हा समारंभ संपला. □

मोठमोठ्यांना जे साधत नाही व साधलेले नाही ते येथे एका शाळाकॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे... —प्रा. वा. ल. कुलकर्णी (प्रास्ताविकातून)

**सांगत्ये ऐका**

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची दाद लाभलेले हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र.

तिसरी आवृत्ती । किंमत : बारा रुपये


राजहंस प्रकाशन, पुणे ३०

**अडवाणी – ऑर्लिकोन**

**ROCKETARC**

# मिनि वेल्डर्स

इ एस ए ५०/इ एस ए १३०



## लहानशा अरुंद जागीही तुम्हाला साथ देतात. वेल्डिंगचे काम सहजपणे, त्वरित व सुलभ करण्यासाठी तुम्हाला सहाय्य करतात.



कारण ही वेल्डर्स आकाराने लहान असून सुविधापूर्ण आहेत.
वजनाला हलकी, ने आणीस सोयीची व कामास बिनत्रासाची आहेत.

शिवाय ती किफायती आहेत. त्यांची बांधणी मजबूत, ड्रीप-प्रूफ
असून ती आंतरराष्ट्रीय पातळीला अनुरूप आहे.

या वेल्डर्सच्या मदतीने वर्कशॉप्स, ऑटोगॅरेजिस व जॉबवर्कर्सचे काम
व्यवस्थित चालू शकते.. मग तुमची कामाची जागा कितीही
दूर असेना का?

विशेष माहितीकरिता आपल्या नजिकच्या आमच्या प्रादेशिक कचेरीस लिहा :

**अडवाणी–ऑर्लिकोन लिमिटेड**

- पो. बॉ. नं. ६०१२, मुंबई-४०० ०१२ • पो. बॉ. नं. ११२१३, कलकत्ता-७०० ०१४
- पो. बॉ. नं. १०१, नवी दिल्ली-११० ००१ • पो. बॉ. नं. ४५२२, मद्रास-६०० ००६
- पो. बॉ. नं. १९/८३, रायपुर-४९२ ००१
- रजि. ऑफिस : अॅडोर हाउस, ६ के दुभाष मार्ग, मुंबई ४०० ०११

ador

ADVANI-OERLIKON
WELDERS TO THE NATION

heros'·AO 278 MAR

**हजारो मैलांचा प्रवास, मुलाखती, चर्चा, गाठीभेटी यांवर आधारित**
**'माणूस प्रतिनिधी' सादर करीत असलेली नवी लेखमाला**

# अस्वस्थ आसाम

**लेखांक दुसरा**

**विनय सहस्रबुद्धे**

## घुसखोरी आणि औद्योगिक मागासलेपणा : दोन दुर्लक्षित समस्या

सर महंमद सादुल्ला यांच्याकडे आसामचं नेतृत्व गेल्यानंतर पूर्व-बंगालमधून आसामात येणाऱ्या मुस्लिम बंगाल्यांना कशा प्रकारे प्रोत्साहन मिळालं याची चर्चा मागच्या लेखांकात आली आहे. आसामातील सध्याच्या आंदोलनात सक्रीय असलेल्या आसाम साहित्य सभेने काही महिन्यांपूर्वी राष्ट्रपतींना लिहिलेल्या निवेदनाच्या सुरुवातीसच सर सादुल्ला यांच्या या 'कामगिरीचा' संदर्भ देण्यात आला आहे, त्याचा थोडक्यात आढावा घेऊन स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर आसामच्या इतिहासाकडे वळतो.

ज्येष्ठ असमिया साहित्यिक श्री. अतुलचंद्र बारुआ यांच्या अध्यक्षतेखालील आसाम साहित्यसभेने राष्ट्रपतींना दिलेल्या निवेदनात स्पष्टच म्हटले आहे की सर महंमद सादुल्ला यांच्या नेतृत्वाखालील सरकारने योजनाबद्ध रीतीने पूर्वबंगालमधील मुस्लिमांना आसामात आणविले ही वस्तुस्थिती आहे. 'आसामातील मुस्लिमांची संख्या पद्धतशीरपणे वाढवून व त्यांना येथे बहुसंख्य करून आसामचा पूर्वपाकिस्तानात समावेश व्हावा अशी मुस्लीमलीग नेत्यांची इच्छा होती व त्या दृष्टीने ते प्रयत्नशीलही होते. एकीकडे आपली संख्या वाढवून आसामला पाकिस्तानात लोटण्याचा मुस्लिमांचा प्रयत्न होता तर दुसरीकडे बंगाली हिंदूंची संख्या वाढवून 'बृहत्तर बांगला'चे स्वप्न साकार करण्याची बंगाली हिंदूंची धडपड होती. या दोन्ही प्रयत्नात 'अकारण कुचंबणा झाली ती असमियांची,' असेही या निवेदनात म्हटले आहे. सध्याच्या खोट्या सेक्युलॅरिझमच्या जमान्यात साहित्यसभेसारख्या संघटनेने स्पष्टपणे मुस्लीमच्या कारवायांवर प्रकाश टाकला ही बाब उल्लेखनीय आहे म्हणूनच साहित्यसभेच्या निवेदनातला काही भाग उद्धृत केला आहे.

□

स्वातंत्र्य चळवळीत आसाम काहीसा अलिप्त दिसून येतो याचेही मुख्य कारण देशाच्या मुख्य प्रवाहापासून तो नेहमी अलग राहिला हेच आहे. ब्रिटिशांविरुद्ध छोट्यामोठ्या हालचाली करणाऱ्या आसाम 'असोसिएशनचं १९१८ मध्ये काँग्रेसमध्ये विलिनीकरण झाल्यानंतरच स्वातंत्र्याच्या चळवळीत असमियांचं योगदान खऱ्या अर्थानं सुरू झालं. अर्थात ब्रिटिशांविरुद्ध क्रांतिकारी उठावाचे प्रयत्न आसामात झाल्याचं दिसून येत नाही. त्याउलट राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार करून जनतेत स्वातंत्र्याविषयीची जागृती निर्माण करण्यावरच असमियांनी लक्ष केंद्रित केल्याचं आढळतं. परिणामत: भारत स्वतंत्र होण्याच्या सुमारास आसामात राष्ट्रीय शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांनी सुरू केलेली माध्यमिक विद्यालये एकूण २२० होती, तर

ब्रिटिशांनी सरकारिरीत्या सुरू केलेल्या विद्यालयांची संख्या अवघी २८ होती.

आसामात राष्ट्रीय चळवळीने चांगले मूळ न धरण्यामागे स्वातंत्र्य-चळवळीच्या तत्कालीन नेत्यांनी या प्रदेशाकडे केलेलं दुर्लक्ष, या प्रदेशाविषयी दाखविलेलं अज्ञान हेही एक महत्त्वाचं कारण असावं असं वाटतं. आपल्यावर अन्य भारतीयांनी केलेल्या अन्यायाची कहाणी सांगताना सुशिक्षित असमिया नागरिक ज्या गोष्टीचा आवर्जून उल्लेख करतो ती म्हणजे महात्माजींनी असमियांबद्दल दाखविलेलं अज्ञान ! 'हिंद स्वराज' या नावाच्या आपल्या पुस्तकात महात्माजींनी सबंध इशान्य भारतातील लोक हे ठग आणि पेंढाऱ्यासारखे आहेत असं म्हटलं आहे. उर्वरित भारताला पूर्व बंगाल पलीकडच्या इशान्य भारताची तोंडओळखही तेव्हा नव्हती हेच यावरून दिसून येतं. अर्थात 'यंग इंडिया' या आपल्या वृत्तपत्रात काही वर्षांनंतर 'लव्हली आसाम' हा एक लेख लिहून महात्माजींनी आपली चूक सुधारली हेही नमूद केलं पाहिजे.

स्वातंत्र्याबाबत, आणि मुख्य म्हणजे फाळणीनंतरच्या आपल्या भवितव्याबाबत असमिया समाज जागृत झाला तो स्वातंत्र्य ऐन उंबरठ्यावर आले असताना. आपल्याकडे दुर्लक्ष झाल्याच्या असमियांच्या तक्रारीला आधार देणारी आणखी एक घटना याच सुमारास घडली, ती म्हणजे भारतीय काँग्रेसच्या नेत्यांनी फाळणीनंतर आसामचा 'क' गटात समावेश करण्यास दिलेली मान्यता.

आसाम, फार काय पण, सबंध पूर्वांचलात खरोखरच मुस्लिम बहुसंख्य आहेत काय, किंवा या प्रदेशातील जनता सांस्कृतिकदृष्ट्या कोणाला अधिक जवळची आहे, आणि त्याहीपेक्षा या प्रदेशातील जनतेची नेमकी इच्छा काय आहे यापैकी कशाचाच विचार न करता आसामचा 'क' गटात समावेश करण्यास, म्हणजेच आसाम पूर्व-पाकिस्तानात समाविष्ट करण्यास काँग्रेसी नेत्यांनी मान्यता दिली ! काँग्रेसी नेत्यांच्या अदूरदर्शी आणि अविचारी निर्णयाने असमियांवर केलेल्या घोर अन्यायाची ही जखम आजही बरीच खोलवर असल्याचं दिसून येतं.

काँग्रेसी नेत्यांच्या या निर्णयाला आसामचे माजी मुख्यमंत्री गोपीनाथ बार्डोलोई यांनी लोकलढा संघटित करून जोरदार विरोध दर्शविला. सुदैवाने महात्मा गांधींचे समर्थन त्यांना मिळाले आणि आसाम भारतातच राहणार ही गोष्ट नक्की झाली.

फाळणीनंतर राजकीयदृष्ट्या आसाम भारताचा भाग बनला खरा; पण त्यानंतर अगदी १९५० पर्यंत उर्वरित भारताशी जोडणारे रस्ते किंवा लोहमार्ग नसल्यामुळे आसाम उर्वरित भारतापासून दूरच राहिला. साडेआठ कोटी रुपये खर्चून स्वतंत्र भारत सरकारने आसामातील न्यू बोंगाई गावापर्यंत रूळ टाकले आणि त्यानंतरच आसाम उर्वरित भारताशी जोडला गेला.

पण आसामचं दुर्दैव इथेच संपत नाही. पूर्वपाकिस्तानातून येऊ घातलेल्या हजारो हिंदु-मुस्लीम घुसखोरांच्या स्वरूपात आसामवरील अतिक्रमण फाळणीनंतर अधिकच वेगानं होऊ लागलं. आत्तापर्यंत आसामातील मुबलक नैसर्गिक संपत्तीमुळे किंवा मजुरीसाठी अशा सामान्यतः आर्थिक कारणामुळे आसामात घुसखोरी होत होती, फाळणीनंतर त्याला राजकीय आणि धार्मिक कारणांची जोड मिळाली आणि ही समस्या अधिकच उग्र बनत गेली.

फाळणीनंतर पूर्वपाकिस्तानातून भारतात येणाऱ्या सर्व बिगर-मुस्लिमांच्या पुनर्वसनाची जबाबदारी भारताने स्वीकारली; परंतु भारताच्या सर्वच उदार धोरणांप्रमाणे याही धोरणाचा पूर्वपाकिस्तानने गैरफायदा घेतला आणि जास्तीत जास्त बिगर-मुस्लिम आपल्या देशातून बाहेर घालवून देण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला. सुरुवातीस भारताने या कारवायांची गंभीर नोंद घेतली. तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी तर या बिगर-मुस्लीम पाकिस्तानी निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी पाकिस्तानने काही भाग भारताला द्यावा अशीही मागणी केली होती.

भारताच्या या मागणीला काटशह देण्यासाठी पाकिस्तानी नेते लियाकत अलीखान यांनी लगेचच नवीदिल्लीकडे धाव घेतली आणि पंतप्रधान नेहरूबरोबर नेहरू-लियाकत करार घडवून आणला. या कराराचा तपशील पाहिला की पाकिस्तानने हुशारीने डाव खेळून भारतावर मुत्सद्देगिरीच्या बाबतीत कशी सहजासहजी मात केली ते कळून चुकते. या करारात असे म्हटले होते की, भारतात फाळणीनंतर अनेक बिगर-मुस्लीम पाकिस्तानी नागरिक घुसले आहेत व त्यांच्यापैकी जेवढे म्हणून पाकिस्तानात परत येतील त्या सर्वांचा स्वीकार करण्यास व त्यांचे पुनर्वसन करण्यास पाकिस्तान तयार आहे. त्याचबरोबर भारतानेही फाळणीनंतर भारत सोडून गेलेल्या सर्व बिगर-हिंदूंचा स्वीकार करून पुनर्वसन करण्याची जबाबदारी उचलली पाहिजे.

या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, नैसर्गिक अनुकूलतेच्या दृष्टीने पूर्वपाकिस्तानच्या तुलनेत आसाम खूपच वरचढ होता. त्यात पाकिस्तान हे बोलूनचालून एक इस्लामी राष्ट्र ! अशा स्थितीत लियाकत अलींनी कितीही प्रेमाचे निमंत्रण दिले तरी बिगर मुस्लीम नागरिक पाकिस्तानात पुन्हा जातीलच कशाला ? याउलट फाळणीमुळे त्यांना भारत सोडून जावे लागले त्या बिगर हिंदूंना भारतीय प्रदेशात म्हणजेच आसामात स्थायिक होणे केव्हाही फायदेशीरच होते. परिणामतः नेहरू-लियाकत-करारातील पहिल्या तरतुदीनुसार बिगर-मुस्लीम निर्वासितांनी पाकिस्तानात जाण्याचे टाळले आणि दुसऱ्या करारातील तरतुदीचा फायदा घेऊन हजारो बिगर-हिंदू (म्हणजेचे मुस्लीम) पाकिस्तातून चंबूगबाळं उचलून पुन्हा आसामात तळ ठोकून या देशाचे 'कायदेशीर नागरिक' बनले. थोडक्यात म्हणजे 'औदार्य,' 'सामंजस्य', 'सहकार्य' वगैरे शब्दांत गुरफटून भारतीय मुत्सद्द्यांनी केलेल्या या चुकीची फार मोठी किंमत अकारणच आसामला द्यावी लागली.

आसामातील सध्याच्या आंदोलनाला असलेल्या गेल्या तेहतीस वर्षांतील राष्ट्रीय राजकारणाच्या पार्श्वभूमीत १९६२ सालच्या युद्धाचा व त्यानंतरच्या घटनांचा उल्लेख अपरिहार्य आहे. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले आणि मध्यआसामात, ब्रह्मपुत्रेच्या उत्तर तीरावर वसलेल्या तेजपूरपर्यंत चीनी फौजा भारतात आल्या. परकीयांच्या मगरमिठीत सापडलेल्या आसामची अवस्था या काळात मोठी बिकट होती. १९६२ मध्ये आसामवर ओढविलेल्या या आपत्तीची हकिगत भावविवशतेनं सांगताना आसाम जनता

पृष्ठ २१ वर

बगाड ( १० )

# रंगला टी. व्ही. रंगात !

बध्या

नवे सरकार राज्यावर येऊन दोन महिने झाले.

कार्यक्षम आणि निर्णयक्षम अशी पंतप्रधानांची ख्याति आहे.

त्यांच्याबरोबर असताना एक्स्प्रेस गाडीत बसल्यासारखे यशवंतरावांना वाटत असते.

आता तर त्यांच्याबरोबर 'गतिशील नेतृत्वाची पताकाच' म्हणून ओळखले जाणारे संजय गांधीही आहेत.

तेव्हा सरकारचा कारभार एक्स्प्रेसच्या वेगानेच काय पण मारुतीच्या वेगाने व्हायला पाहिजे होता.

स्पेशल कोर्टे जशी आपसूक विरघळून गेली तसे आसामचा प्रश्न, अफगाणिस्तानची घालमेल, वाढती महागाई वगैरे प्रश्न विरघळून जायला हवे होते.

साखरेच्या पोत्याबरोबर दुकानदारच गिऱ्हाइकाला एक एक पन्नासची नोट देतोय, दुकानातली जागा रिकामी केल्याबद्दल, असे दृश्य पहाण्याची तयारी आम्ही करत होतो.

तसं काहीच झालं नाही.

लोकं चिडून नाही नाही ते बडबडू लागली. लाटणी घेऊन पुन: मोर्चे सुरू झाले. मंत्र्यांना घेराओ झाले.

आम्हाला काळजी पडली. ७३-७४ सालचे दिवस आठवले. माताजींचे काय होणार ? त्या झटपट पावले का उचलत नाहीत ? नऊ सरकारांना एका रात्रीत कचऱ्यात काढणाऱ्या माताजी रॉकेल का पुरवत नाहीत ?

आमची चिंता कोण घालवील ? अर्थात् विठ्ठलरावजी गाडगीळ ! माताजींचे स्मरण-संताप ! ! इंदिरा काँग्रेसचे विचार-खंडक ! ! ! गेलो त्यांच्याकडे. मुक्तद्वार आहे बरं तिथे सगळ्यांना.

आम्ही विचारले, 'बॅरिस्टरसाहेब, परिस्थिती हाताबाहेर जाणार असं दिसतंय. नवं सरकार अजून स्वस्थ का ?'

विठ्ठलरावजी गंभीरपणे म्हणाले, 'प्रस्तावनेपेक्षा पुस्तक महत्त्वाचं !'

आम्ही म्हटलं, 'माताजी या कारकीर्दीत काही अपूर्व पुस्तक लिहिण्याची तयारी करतायत् का ? मग प्रस्तावना लांबली तरी हरकत नाही.'

विठ्ठलराव म्हणाले, 'लिखाण लांबू नये. परिणाम पातळ होतो.'

आम्हाला धीर आला. 'म्हणजे थोडचाच काळात परिणामकारक पावलं उचलली जाणार का ? तशी सुरुवात उच्च वर्तुळात झाली आहे का ?'

विठ्ठलराव उत्तरले, 'फलानुमेया: प्रारंभा: !'

च्यायला ! हे संस्कृत कोणाला कळणार ?

आम्ही म्हणालो, 'लवकरच काही फळं दिसतील का ?'

विठ्ठलरावजी हनुवटीवरून हात फिरवीत म्हणाले, 'मी मगाशीच सांगितलं की प्रस्तावनेपेक्षा पुस्तक महत्त्वाचं.'

'आताचं पुस्तक कसं होणार आहे ? मागची ट्रॅजेडी होती.' मीही तिरक्यांत शिरलो.

पण बॅरिस्टरसाहेब वस्ताद. ते म्हणाले, 'लाइफ इज अ ट्रॅजेडी टु दोज हू फील; इट इज् ए कॉमेडी टु दोज हू थिंक.'

शेवटी उठलोच तिथून. दारापर्यंत मला पोचवताना माझी पाठ थोपटून आपले प्रतिनिधि म्हणाले, 'मास्तर, आता मी बोललो ते कुणाला कळता कामा नये, बरं. माय लिप्स् आर सील्ड्.'

### ना. वसंतराव साठे

आता माझी काळजी आणखीच वाढली. आधीच आपल्या देशात संघ-जनसंघादी प्रतिगामी प्रवृत्तींचा नुजबुजाट, जनता सरकारच्या काळात भांडवलदारांना मोकळे कुरण मिळाल्याने ते प्रबळ झालेले, माताजींचे सरकार फ्रीजमधे पडल्यासारखे आणि त्यांचे विचारखंडक विठ्ठलराव यांची ही भ्रमिष्ट अवस्था. कोडे काही उलगडेना. शेवटी आमचे ज्येष्ठ आणि मुरब्बी मित्र चाफाजीराव पाटील दूधवाडीकर यांच्याकडे गेलो. वाटलं होतं की, नव्या सरकारच्या निर्विकल्प अवस्थेमुळे तेही काळजीत पडले असतील; पण तसं काही दिसलं नाही. पहिल्यांदा विषय विठ्ठलरावांचा काढला.

'मास्तर, तू ग्येलासच कशाला त्याच्याकडे ?' चाफाजीराव डाफरले. 'अरे, कांद्याइतकाबी भाव न्हाई त्याला माताजींकडे ! मग काय सांगणार तो तुला. चल आज वसंतरावांकडे !'

'कोण वसंतराव,.आपले सांगलीचे ?'

'नाव काढू नकोस् त्याचं. अरे, परवा गेलो होतो दादाला भेटायला. बबन्यासाठी तिकीट मिळेल का विधानसभेचं म्हणून विचारायला. बसा, म्हणून म्हणाला नाही ! शालिनीताईंचा प्रचार का केला नाहीत त्याचं उत्तर द्या, म्हणाला.'

'अहो, पण मग हे वसंतराव कोण ?'

'मास्तर, अडाणी हैस.. अरे हे आपले वसंतराव साठे. आज फिल्म इन्स्टिटयूटमध्ये कार्यक्रम आहे त्यांचा. उद्या त्यांच्याचबरोबर अकलूजला जायचंय सहकारमहर्षी शंकरराव मोहिते पाटलांच्या पुतळचाच्या उद्घाटनासाठी. चल जाऊ भेटायला !'

चाफाजीरावांच्याच मोटारीतून 'भारतीय फिल्म आणि दूरदर्शन संस्थान'च्या आवारात गेलो. वसंतराव डाव्या काखेत एक मोहक किरमिजी-करडी झाक असलेले मांजर घेऊन संस्थानाची पाहणी करत होते. मी आणि चाफाजीराव जवळ पोचलो, तेव्हा उजव्या हाताने मांजराची मान कुरवाळत वसंतरावजी म्हणाले, 'या, या चाफाजीराव. केव्हा पासून वाट देखून राह्यलोय तुमची.' चाफाजीराव म्हणाले, 'नमस्कार, मिनिस्टरसाहेब. ही काखमांजरी केव्हा झाली तुम्हाला ?' गदगदून हसले वसंतराव. 'आता आम्ही 'रंगीन दूरदर्शन' सुरू करतोय ना; त्यामुळे रंगाचा नाद जडलाय आम्हाला. पहा हे मांजर, किती छान दिसेल रंगीत

टी. व्ही. वर ! बरं, पण हे कोण ?'

चाफाजीरावांनी माझी ओळख करून दिली. म्हणाले, 'इंदिरा कांग्रेसचा मोठा सहानुभूतिदार आहे आमचा मास्तर; पण वाढत्या महागाईपुढे माताजींच्या सरकारने जी निष्क्रियता पत्करल्ये त्यामुळे गोंधळात पडलाय. त्यातून विठ्ठलराव काही मार्गदर्शन करीनात, तेव्हा तुमच्याकडे आलाय्. सांगा जरा धीराचे दोन शब्द !'

माझ्याकडे वळून साठे म्हणाले, 'कशामुळे व्याकुळ झालाय एवढे तुम्ही ?' त्या कळवळ्यानेच माझे हृदय भरून आले. कसनुसा होऊन म्हणालो, 'नाही. आपले हेच की, गॅस नाही, रॉकेल नाही, कोळसे नाहीत, साखर नाही त्यामुळे प्रजा हैराण झाल्ये. ती माऊली गोरगरिबांविषयींच्या ममतेसाठी प्रसिद्ध आहे; पण सरकार काहीच हालचाल करताना आढळत नाही. त्यामुळे रयतेच्या मनात संशयाचं काहूर माजतं. घराघरातून पोचलेले जातीयवादी संघटनांचे स्वयंसेवक त्याचा फायदा घेण्यास टपलेलेच आहेत. म्हणून आपल्या भेटीला येण्याचं आक्रीत केलं.'

## रंगीत टी. व्ही.

'मास्तर, तुमची तगमग आम्हाला कळते. माताजी त्यासाठी काही करत नाहीत असं तुम्हाला वाटतं तेही चूक नाही. कारण त्या हल्ली काही करतच नाहीत. सगळं काही संजयजीच बघतात. त्या महात्म्याने या सर्व प्रश्नांवर पूर्वीच अक्सिर तोडगा योजून ठेवला आहे. त्या फिरोजपुत्राच्या बुद्धीचे पलांडण तुम्हा आम्हाला नाही कळायचे !' आदराने मान-लववून वसंतरावजी म्हणाले.

'धन्य आहे त्या पुण्यश्लोकाची !' मी म्हणालो. 'कोणता बरं हा अमोघ इलाज ?'

'रंगीत टी. व्ही. !' टी. व्ही. वर जाहिरात वाचणाऱ्याच्या ठसक्यात मंत्रीवर वदले. 'तुम्हाला आठवत असेल की, ७७ च्या निवडणुकीपूर्वी दिल्लीला जे. पीं. ची सभा होती. तिथल्या गर्दीला उतारा 'म्हणून आमच्या सरकारने त्या दिवशी संध्याकाळी टी. व्ही. वर 'बॉबी' हा सिनेमा दाखवायचं ठरवलं; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. लोकांनी जे. पीं. च्या भाषणाला गर्दी केलीच. तेव्हापासून गेली तीन वर्षं हाच खल चालला होता. माताजी म्हणत 'बॉबीचा उपयोग झाला नाही. विद्या (म्हणजे व्ही. सी. शुक्ला हो) हातावर हात घासत म्हणे 'शोलेच दाखवायला हवा होता.' फक्त संजयजी म्हणत, 'देअर इज सम रुॅग. बॉबी कॅनॉट फेल' आणि त्या दीर्घमति नरर्षभाने काढले कारण शोधून !'

'कोणते ते ?'

'रंगीत टी. व्ही. !' पुन्हा मगाच्याच ठसक्यात मंत्र्युत्तम वसंतराव म्हणाले, 'अहो, बॉबी हा रंगाची लयलूट करणारा स्वप्नरम्य सिनेमा आणि आपला टी. व्ही. पडला काळा पांढरा. अरे, डिंपल काय रडणार त्या टी. व्ही. वर ? 'बॉबी', 'शोले' असले भन्नाट चित्रपट दाखवायला हवेत...'

'रंगीत टी. व्ही. !' न कळत मीच जाहिरातीच्या ठेक्यात म्हणून गेलो असा रंगीत टी. व्ही. चा प्रभाव आहे.

माझी बुद्धी भेलकंडलेली बघून खाकरून घसा साफ करत चाफाजीराव म्हणाले, 'ते खरं साठेसाहेब; पण रंगीत टी. व्ही. वर यांची गॅसची शेगडी, नाही तर स्टोव्ह पेटायचा कसा ?'

कसली ही क्षुद्र शंका अशा भावनेने आपल्याच चेहऱ्यापुढे वसंतरावांनी डावा पंजा झटकला. तेवढ्यात त्यांच्या काखेची पकड ढिली पडली आणि निगरगट्ट चेहऱ्याचे पण किरमिजी-करड्या रंगाचे ते मांजर निसटून पळून गेले. रंगीत टी. व्ही. चा सगळा मनोरा ज्या मांजरावर अवलंबून तेच पळाल्यावर माझ्या गॅसच्या चुलीकडे कोण लक्ष देणार ? त्या हुल्लडीतून मी आणि चाफाजीराव कसेबसे निघून आलो. मांजराला शोधण्यासाठी स्टुडिओतल्या खोट्या भिंतींच्या सापटीत शिरलेली पंजाबी छोकराछोकरीची एक जोडी संध्याकाळी गुदमरल्या अवस्थेत अस्ताव्यस्त सापडली असं सांगतात. मांजर अजूनही सापडले नसल्याने असे प्रसंग आणखीही घडतील !

## जनतेची मागणी आहे

'काही म्हण मास्तर,' चाफाजीराव म्हणाले 'ही रंगीत दूरदर्शनाची कल्पना लई नामी हाय. आता बघ बरं का आमचा बबन्या निवडणुकीला उभा रहाणार आहे. त्याच्या आत रंगीत टी. व्ही. आला तर असा फस् क्लास प्रचार करता येईल यंवू !'

'तो कसा काय, चाफाजी ?'

'आमच्या बबन्याची एक तल्लख कोंबडी आहे, लेग हॉर्न. हा, काय गोजीरवाणी आहे आणि दिवसाला अंडी किती देते ? साहा ! काय झळकतात ती लालसर झांक असलेली अंडी. आता सीन पहा हं. आमच्या दूधवाडच्या बंगल्याच्या मागं झक्क हिरवळ आहे. तिच्यावर ही आमची हिरा कोंबडी ऐटीत उभी आहे. काय तिचा झोक! वाकडी मान, एका पायावर उभं राहून दुसरा पाय झटकण्यातला ऐब. वाऱ्यावर मुरमुरणारी पांढरीफेक पिसं. पिवळी जर्द चोच आणि वर दिसे न दिसे असा लालचुटुक तुरा. जवळच्या हाऱ्यात सहज रचून ठेवलेली गेल्या आठवड्यातली पन्नास अंडी. बबन्या पायऱ्या उतरून झपझप चालत येतो. हिरीची मान मुठीत धरून उगा कुरवाळतो. पाठीमागून एक मंजुळ आवाज म्हणतो, बबनरावची हिरा आपल्याला पन्नास अंडी देते !' ते ऐकताच हिरी चोच मुरडून म्हणते, 'बबनरावांची निगराणीच हाय तशी !' काय, क्लिक् होईल की नाही ?'

कपाळाला हात लावला अन् घरी निघून आलो. त्यानंतर पहातो तो रंगीत टी. व्ही. ची लाट इंदिरा लाटेसारखीच पसरत चालली आहे. बनारसी साडीवाल्यांनी एकमताने ठराव केला की, 'रंगीत दूरदर्शन झालेच पाहिजे !' त्यांचे म्हणणे असे की, टी. व्ही. वर इंदिराजी रोज दाखवल्या जाणार, त्यामुळे झुळझुळीत नवरंगी आणि जरतारी साड्या घरोघरच्या सुंदरींना आकर्षित करत रहातील. साडीवाल्यांच्या धंद्याला बरकत येणार. शालधारी संजय गांधीही टी. व्ही. वर दिसतीलच ! त्यामुळे काश्मिरी शालवाले खूष आहेत.

आमची मैत्रिण कविता पंढरपुरेही आनंदात आहे 'हाऽऽ रंगीत टीऽ व्हीऽ' डोळे गच्च मिटून हात आवळीत ती किंचाळली. 'हौ नाइस ! इल्. ए. फान्तास्तिक !' तिला फ्रेंचही येते. 'राफेलच्या चरित्रावर कादंबरी आहे का रे कुणाची ?' मला काही संबंधच लागेना. 'व्हू झेत् इन्योरा. आता राफेलची रंगीत चित्रं दाखवतील टी. व्ही. वर. मग, खपेल ना राफेलवरची माझी कादंबरी. ओहो,

पृष्ठ १७ वर

# स्टॅलिनपेक्षा युगोस्लाव्हियाला अधिक महत्त्व देणारा पहिला साम्यवादी नेता : मार्शल टिटो

अविनाश भावे

आजकाल वृत्तपत्र उघडले की नित्याच्या अपघाताच्या, राजकीय घालमेलीच्या, महागाई वाढल्याच्या बातम्या प्रथम आपल्या वाचण्यात येतात. याबरोबरच युगोस्लाव्हियाच्या राजधानीहून बेलग्रेडहून आलेली एक बातमी असते. '

प्रेसिडेंट टिटो अत्यवस्थ.

त्यांच्या प्रकृतीत सुधारणा नाही.

२० जानेवारीला त्यांच्या डाव्या पायाचे अ‍ॅम्प्यूटेशन केल्यापासून तर त्यांचे हृदय आणि मूत्राशय फार कमजोर झाले आहे.

जगाच्या राजकारणात धडाडीने पुढाकार घेणाऱ्या या सत्त्याऐंशी वर्षाच्या, रुग्णशय्येवर पडलेल्या महारथीला, क्रान्तिकारक अध्यक्षाला वाचवण्यासाठी युगोस्लाव्हियातल्या निष्णात डॉक्टरांची तुकडी दिवसरात्र जिवाचे रान करीत आहे.

हे सर्व वाचले म्हणजे मुंबईच्या जसलोक रुग्णालयात स्वर्गीय जयप्रकाश नारायण यांची साक्षात मृत्यूशी चाललेली झुंज आठवते. फरक इतकाच की, कै. जयप्रकाश हे हाती सत्ता किंवा अधिकार नसलेले एक थोर भारतीय क्रांतिकारक होते, तर टिटो हे युरोपातल्या युगोस्लाव्हियाचे प्रेसिडेंट आहेत. मार्शल हाही बहुमान ते धारण करतात. सर्व जनता आणि जग त्यांना टिटो या नावानेच ओळखते. हे नाव त्यांचा भूमिगत, राजकीय, क्रांतिकारक लढा चालू असताना त्यांच्या दोस्तांनी, कॉम्रेडसनी दिलेले आहे. त्याचा आशय 'तू, ते कर' असा असल्याचे सांगतात. 'तू ते कर' असं आपल्या साथींना सांगण्याचा अधिकार त्यांच्याकडे सुखासुखी आलेला नाही. ते समजावून घ्यायला त्यांच्या जन्मकाळाच्या वैशिष्टयाची माहिती करून घ्यायलाच पाहिजे. कारण त्या काळाच्या उदरातूनच सर्व जगाचा चेहरा-मोहरा बदलून टाकणारे महापुरुष जन्माला आले. जोसेफ ब्राँझ (टिटो) हा त्यातलाच एक. त्याचा जन्म १८९२ मध्ये ऑस्ट्रो हंगेरियन साम्राज्यातल्या, झाग्रेब गावाजवळ झाला. वडील 'क्रोट' आणि आई 'स्लोवन' अशा दांपत्याला झालेल्या एकूण पंधरा अपत्यांपैकी जोसेफ हे सातवे पुत्ररत्न. झागोर्ज या डोंगराळ मुलुखातल्या झाग्रेब गावाजवळ रहाणारे हे एक गरीब शेतकरी कुटुंब.

त्या काळात हॅप्स्बर्ग घराण्याची अधिसत्ता असलेल्या, ऑस्ट्रियन साम्राज्याची राजधानी व्हिएन्ना ही सर्व दृष्टींनी अद्वितीय नगरी होती. तिचे महत्त्व समजायला आपल्याला एकदम एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीच्या काळात झेप घ्यावी लागेल. मावळते एकोणिसावे शतक आणि उगवते विसावे शतक याच काळात युरोपच्या भूमीतून हिरे आणि हलाहल उदयाला आलेले जगाने, इतिहासाने पाहिलेले आहे. लेनिन, स्टालिन, मुसोलिनी, फ्रॅन्को, अ‍ॅन्टोनिओ, सालाझार इतकेच नव्हे तर टिटोच्या आधी तीनच वर्षे अ‍ॅडॉल्फ हिटलरचा जन्म याच साम्राज्यातल्या ब्रॉनॉमध्ये झालेला होता.

एकाच वेळी सर्व युरोपभर राजेशाही आणि साम्राज्यशाही यांना उखडून टाकणारे स्वातंत्र्य, समता आणि लोकसत्ता यांचा दिव्य अग्नि पोटात खदखदत असलेले अनेक ज्वालामुखी जागृत झाले होते.

जोसेफच्या कुटुंबाच्या वाटचाला १० एकरांचे एक शेत, छोटा मळा आणि दोन खोल्यांचं अर्धमुर्धं घर आलं होतं. कशी तरी गुजराण चालू होती. एकूण १५ अपत्यांपैकी ७ च वाचली. त्यातलाच एक 'टिटो'. येवढ्या कुटुंबाची शेतीच्या उत्पन्नावर गुजराण होत नसल्याने टिटोच्या बापाला शेतीच्या जोडीला लोहारकाम, सुतारकाम हीही कामे करावी लागत. त्या वेळी सर्वांना मक्याच्या भाकरीचे जेवण भेटत असे. टिटोचा आजा तिकडे दूर डोंगरातल्या जंगलात कोळसा पाडायचे काम करीत असे. आई तर अति कर्मठ कॅथलिक होती. मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत आई-वडील मोठेसे उत्सुक होते असे नव्हे; पण टिटोंनी शाळेत जाण्याचा दिवस उजाडला. तो जरी फार अभ्यासू विद्यार्थी म्हणून प्रसिद्धीला आला नसला तरी चांगला धट्टाकट्टा, उत्साही, काटक असा गावरान तरुण होता. पोहणे आणि घोडदौड यांची मनापासून आवड, इतर सर्वसामान्य सवंगड्यांबरोबर लोकांच्या फळबागांवर डल्ला मारायलाही कमी करीत नसे. या कामात पोरांचं पुढारीपण करायला लायक असा हुशार, तगडा तरुण निश्चितच तो होता. असा मुलगा घरात एके ठिकाणी किती काळ काढणार ?

वेटरच्या कामाची उमेदवारी करण्याच्या निमित्ताने त्याने वयाच्या १४ व्या वर्षीच घराला रामराम ठोकला आणि आपले बळकट पंख पसरले; पण 'सिसाक' शहरी दाखल झाल्यावर त्याने प्रत्यक्षात टाळाचावीच्या धंद्यात उमेदवारी सुरू केली आणि आयुष्यात प्रथमच मशिनरी, रेल्वे, राजकारण या थक्क करणाऱ्या शहरी अपूर्वाईशी त्यांची जानपछान झाली.

अचूक काम करणारी यंत्रे, जर्मन भाषा, बुद्धिबळाचा खेळ, समाजवाद, भोळसट आणि अज्ञानी धर्मगुरूंचा ढोंगीपणा, ऑस्ट्रियन

राज्यकर्त्यांचा दुष्ट अन्यायीपणा या सर्वांचे झपाट्याने आकलन होण्याइतकी तल्लख बुद्धी टिटोपाशी निश्चितच होती.

व्हिएना राजधानी असलेल्या ऑस्ट्रियन साम्राज्याच्या प्रजेचे संस्कृती, भाषा, राष्ट्रीयत्व या दृष्टीने एकात्म स्वरूप कधीच नव्हते. त्यातल्या त्यात स्लोव्हॅक्स, सर्बस्, क्रोटस्, स्लोवनस्, अल्बानियन्स, मॅसेडोनियन्स आणि पोल्स् वगैरे निरनिराळ्या भाषा बोलणारे, अलग अलग राष्ट्रीयत्व आणि आशाआकांक्षा बाळगणारे लोक फार हलाखीत, दारिद्र्यात दिवस काढत होते.

आधीच वर्णन केलेला टिटोच्या व्यक्तिमत्त्वातला बदल, देशांतर्गत राजकीय परिस्थिती आणि कारखान्यात ज्या फोरमनच्या हाताखाली तो काम करत होता त्याची साम्यवादी विचारांची शिकवण याचा परिपाक म्हणजे टिटो हा एक पक्का राष्ट्रवादी कमुनिस्ट बनला. कामगारांशी सतत संपर्क येत असल्याने तो भांडवलशहांचा आणि परकीय साम्राज्यशाहीचा कट्टर शत्रू बनला. वाचनाचे तर त्याला इतके वेड होते की, तो उमेदवारी करताना एक दिवस वर्गातच दुसरे काही साहित्य वाचत असताना रेड हॅंडेड सापडला. ही गोष्ट त्याला फार अपमानास्पद वाटली आणि दुसरा काही विचार न करताच इन्स्टिटयूट सोडून तो बेपत्ता झाला; पण त्याला पकडून आणले. अल्पमुदतीची तुरुंगवासाची शिक्षाही त्याला भोगावी लागली.

तुरुंगातून सुटका झाल्यावर त्याने अॅप्रेन्टिसचा कोर्स पुरा केला. १९१० मध्ये तो इंजिनिअरिंग वर्कर झाला. त्यानंतर एक-दोन वर्षांतच कम्युनिस्ट पक्षाचा तो कार्डहोल्डर सभासद झाला. इतकेच नव्हे, तर क्रोट सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचाही सभासद झाला. या दोनही संस्थांच्या सभासदांना पक्षाच्या बेकायदेशीर, भूमिगत, गुप्त अशा स्वरूपाच्या कार्यात भाग घ्यावा लागत असे. अशी सर्व तयारी असलेला तरुण टिटो, दरिद्री आणि अज्ञानी क्रोटस आणि स्लोवन्स लोकांचा नेता व्हायला सज्ज झाला. या कामात त्याला अवगत असलेल्या जर्मन भाषेच्या ज्ञानाचा फार फायदा झाला.

जून १९१४ मध्ये त्याचे सक्तीचे लष्करी शिक्षण संपत आले होते; पण याच सुमारास ऑस्ट्रिया आणि हंगेरी यांच्या गादीचा वारस, हॅप्सबर्ग साम्राज्याच्या सम्राटाचा पुतण्या आर्चड्यूक फर्डिनंड फ्रॅन्सिस याचा त्याच्या पत्नीसह बॉस्नियातल्या साराजेवो या गावी खून करण्यात आला. या हत्येमागे 'ब्लॅक हॅंड' नावाच्या दहशतवादी संघटनेतल्या सर्व राष्ट्रवाद्यांचा हात होता हे लवकरच समजून आले. इतकेच नव्हे तर सर्बियन पंतप्रधान आणि सेनानी हे या कटात सामील झाले होते हेही उघडकीस आले. या खुनाने बाल्कन राष्ट्रांच्या राजकारणात पेटती काडी टाकली गेली आणि थोड्याच अवधीत या शोकांतिकेचे १९१४ च्या पहिल्या महायुद्धाच्या वणव्यात रूपांतर झाले.

पहिल्या महायुद्धाच्या तयारीची शिंगे, तुताऱ्या, ड्रम्स आणि नगारे यांचा घोष सर्व युरोपखंडभर निनादू लागला. शत्रु-मित्रांच्या आघाड्या दंड थोपटून शस्त्रे परजू लागल्या. ऑस्ट्रियाने सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले, तर जर्मनीने ऑस्ट्रियाला पाठिंबा दिला; पण आग जास्त भडकू न देण्याची दक्षता घेतली. रशियाने आपले सामर्थ्य जवळचे सोयरे या नात्याने सर्बस आणि स्लावस् यांच्या पाठीशी उभे केले. तत्काळ जर्मनीत रशियाला शत्रुराष्ट्र म्हणून घोषित केले. तिकडे फ्रान्सने आपले सर्व लष्करी सामर्थ्य लढाईच्या पवित्र्यात उभे केले; पण फ्रान्सला युद्धाचे डावपेच करायला उसंत न देता त्याच्याही विरुद्ध जर्मनीने युद्ध पुकारले. जर्मनीने तावडतोब आपले सैन्य बेल्जममार्गे घुसवून फ्रान्सवर धाड घातली. ही सर्व कृत्ये १८३९ च्या तहाचा भंग करणारी असल्याने आणि खुद्द ब्रिटनला या आगीची झळ लागताच तेही जर्मनीच्या विरोधात उभे ठाकले. ( ४ ऑगस्ट १९१४ ) काही महिन्यांच्या कालान्तराने इटलीने आपला पुराना दुष्मन 'ऑस्ट्रिया 'च्याविरुद्ध युद्ध पुकारून ब्रिटन आणि फ्रान्स या दोस्त राष्ट्रांच्या गोटात प्रवेश केला. तुर्कस्तानची तर पूर्वीपासूनच जर्मनीशी बांधिलकी होती. रहाता राहिली रुमानिया, ग्रीस, पोर्तुगाल ही राष्ट्रे. तीही दोस्त राष्ट्रांच्या आघाडीत सामील झाली. १९१७ मध्ये तर अमेरिकेनेही दोस्त राष्ट्रांच्या बाजूने आखाड्यात प्रवेश केला. या वेळी 'टिटो' काय करत होता? लढाईबद्दल यत्किंचितही आस्था नसलेल्या ८० क्रोटस् जवानांच्या प्लॅटूनचा तो सार्जंट मेजर होता आणि कार्पेथियन पर्वताच्या मुलुखात तितक्याच निरुत्साही रशियन फौजेशी ऑस्ट्रियाचा मुकाबला करत होता. दोनही परस्पर विरोधी फौजांना या लढाईचे काहीच घेणे नव्हते. कारण लढाई होती ऑस्ट्रियाची–जर्मनीची आणि लढायचे होते आपल्याच स्लाव बांधवांशी. अशा परिस्थितीत क्रोटस् सैनिक सहजासहजी रशियाचे युद्धबंदी झाले किंवा आघाडीवर गेलेल्या टेहेळणी तुकड्या किंवा स्काउटस् बेपत्ता झाले तर त्यात नवल वाटण्याचे कारण नव्हते. ब्रॉझ (टिटो) मात्र स्वत: होऊन रशियनांच्या ताब्यात गेला नाही; पण लढाईत अनेक जखमांनी घायाळ झालेल्या त्याला रशियन पायदळाने ताब्यात घेतले.

युद्धबंदी असताना टिटोचे वास्तव्य दूर वोल्गानदीच्या तीरावर कझानच्या छावणीत होते. या एक वर्षाच्या अवधीत त्याने रशियन भाषा शिकून घेतली. मग टॉल्स्टॉय, डोस्तोवस्की, गोगोल, गॉर्की यांचा अभ्यास करणे फारच सोपं झालं. यानंतर त्याच प्रांतात काही काळ त्याने स्थानिक कुलक शेतकऱ्यांच्याकडे मोजमजुरी केली. मग मात्र लवकरच त्याचे भ्रमण सुरू झाले. आता तर तो दूर सायबेरियात रेल्वेबांधणीच्या प्रकल्पात काम करू लागला. याबरोबर रेडक्रॉस संघटनेच्या कचेरीत लिखाणाच्या कामातही स्वेच्छेने मदत करत होता. त्याचे पूर्वचरित्र आणि विचारसरणी यामुळे असंतुष्ट कामगार आणि आज ना उद्या बंडाचा झेंडा उभारू शकतील अशा तरुणांच्या सान्निध्यात तो आला यात काहीच नवल नाही. मनातून गोंधळून गेलेल्या सर्वच रशियनांना नजीकच्या भविष्यकाळात उडणाऱ्या भडक्याची आणि उठावाची सतत जाणीव होत होती. ज्वालामुखीच्या मुखावरच सर्व देश बसला होता.

## बोल्शेव्हिक चळवळीत

अखेर १९१७ सालातला मार्च महिना उगवला. पेट्रोग्राडमध्ये झालेल्या क्रांतीबरोबर संपूर्ण रशियाभर उठाव झाले. कम्युनिस्टांची युद्धबंदीची मागणी मान्य होण्यापूर्वीच मोठ्या उत्साहाच्या वातावरणात युद्धकैद्यांना मुक्त करण्यात आले. ब्रॉझ (टिटो) मागचापुढचा विचार न करता बोल्शेविक चळवळीत भाग घेण्यासाठी थेट पेट्रोग्राडमध्ये दाखल झाला. जून १९१७ च्या सुमारास रशियात

सुरक्षित रहाणे अशक्य होताच लेनिन सीमापार होऊन फिनलंडमध्ये गेला. त्याच्या पावलावर पाऊल ठेवून ब्रॉझही सीमापार झाला. रशियन जीवनात जसा गोंधळ, अव्यवस्था आणि अराजक माजले होते तोच प्रकार ब्रॉझच्या वैयक्तिक धाडसी जीवनाचा झाला होता. त्याला अटक झाली आणि लगेच सुटकाही झाली. तो पेट्रोग्राडला परतला तर केरेन्स्कीच्या पोलिसांनी त्याला अटक करून सायबेरियाकडे जाणाऱ्या रेलगाडीवर चढवले; पण हा वस्ताद वाटेतच रेलगाडीतून पळाला ! भोवतालच्या वैराण मुलुखाची काहीच माहिती नाही; पण मार्गक्रमणा सुरू ठेवली. कधी पायपीट करत तर कधी घोडागाडीत हिच-हाईक करत, तर कधी रेल्वेडब्याचा आसरा घेऊन अखेर तो ओम्स (Omsk) शहरी येऊन दाखल झाला. या आधी एकच दिवस बोल्शेविकांनी पेट्रोग्राडच्या विंटर पॅलेसवर कबजा केला होता.

रशियात गोंधळ, अंदाधुंदी आणि अराजक यांचा अगदी कळस झाला होता. काही प्रदेश कम्युनिस्टांच्या (रेडस्) ताब्यात तर काही कम्युनिस्ट विरोधक व्हाइट्सच्या अमलाखाली. उरलेला भाग पार्टीझान्सच्या सत्तेखाली तर बाकीचा वादग्रस्त !

रशियातल्या या यादवी युद्धाच्या गोंधळाच्या परिस्थितीत पाश्चिमात्य सत्तांनी प्रवेश केल्यामुळे आणखीनच भर पडली. भरीत भर म्हणून झेक युद्धकैदी व्हाइटस्च्या मदतीला आले. सबंध रशियाभर नित्याची दळणवळणाची साधने मोडून पडली होती. यादवी युद्धात होतात तसे परस्परांवर महाभयानक आघात आणि अत्याचार होत होते. या सर्वांवर ताण म्हणजे उपासमारीचे गिधाड आकाशात घिरट्या घालीत होते.

ब्रॉझ (टिटो) जेथ होता ते ओम्स् शहर एका विचित्र झटापटीने ग्रासले होते. ज्या रेड गार्डस्चा शहरावर तावा होता त्यांच्या गोटात तो दाखल झाला. व्हाइटस् आणि झेक फौजा यांच्या संयुक्त मान्यामुळे ओम्स्चा पाडाव झाला आणि ब्रॉझ हा परागंदा झाला. खरे तर पुढे जी त्याची पत्नी झाली अशा एका सतरा वर्षांच्या क्रांतिकारक तरुणीनेच त्याला लपून रहाण्यासाठी आसरा दिला होता; पण व्हाइटस्ना त्याचा ठावठिकाणा लागला आणि दळणवळणाची सर्व साधने त्यांच्याच नियंत्रणाखाली असल्याने ब्रॉझला उत्तरेकडच्या गवताळ प्रदेशात पळ काढावा लागला.

त्याच्या साहसाने भरलेल्या जीवनातला एक रोमहर्षक प्रसंग या वेळी घडून आला. अनेक महिने फिरस्त्या जमातीच्या किरगीझ घोडेस्वारांच्या छावणीत त्याने वास्तव्य केले. त्यांच्यासारखाच पेहेराव करून तो घोडदौड करायचा, नाठाळ घोड्यांना वठणीवर आणायचा, लांडग्यांच्या शिकारीमागे धावायचा. इतकेच काय, त्यांच्याबरोबर घोडयाचे दूधही प्यायचा! त्यांच्याकडच्या अति कडक अशा मद्याचीही तो मजा चाखत असे. जणू त्यांच्यातलाच एक. हे किरगीज धर्माने मुसलमान. त्यांच्या मुल्लांशीही वाद घालायला तो कमी करत नसे. टाळीचा प्रमुख ईसा याच्यासाठी दळणाची चक्कीही तो चालवत असे. ज्याच्या संरक्षणाखाली निर्धास्त असावे असाच तो मुखिया दिलदार आणि शब्दाचा पक्का होता. हे जरी सर्व खरे असले, भोवतालचा गवताळ प्रदेश, छावणीचे तंबू आणि घोडे, छावणीतले सहकारी या सर्वांशी बरवर जरी तो एकरूप झाला असला तरी चांदण्या रात्री एकांतात विचार करत असताना आपल्या मायभूची, पर्वतराजींनी वेढलेल्या क्रोशियाची काय स्थिती असेल, आपले देशबांधव कोणत्या परिस्थितीत असतील या नुसत्या कल्पनेनेही तो व्याकूळ होत असे. युद्ध संपत आले होते. रशियाप्रमाणेच ऑस्ट्रियाचाही पराभव झाला होता. रशियाप्रमाणेच ऑस्ट्रियातही क्रांती व्हायला कितीसा उशीर होता ? आणि होऊ घातलेल्या क्रांतीतली आपली कामगिरी बजावायला ब्रॉझ अगदी अधीर झाला होता.

१९१९ मध्ये रेड आर्मीचीच सत्ता असल्याने ब्रॉझ ताबडतोब प्रकट झाला. आपल्या बायकोचा शोध घेण्यातही त्याला यश आले. (तीही त्याच्यासारखीच भूमिगत राहून काम करीत होती). दोघे मिळून नव्या उमेदीने, नवीन जीवन जगण्यासाठी नव्या देशात, युगोस्लावियात येऊन पोचले. हीच त्यांची मायभू आणि पुण्यभू.

युद्धविराम होऊन विजयी दोस्तराष्ट्रांनी व्हर्सायच्या तहाने शांतता प्रस्थापित केली हे खरे; पण ती शांतता सुखासमाधानाची नसून भीषण स्वरूपाची होती. तहाचा परिणाम म्हणून मध्य आणि दक्षिण युरोपातल्या राष्ट्रांच्या सीमारेषाच बदलल्या. युरोपचा चेहरामोहराच बदलला.

ऑस्ट्रिया दिवाळखोरीच्या गर्तेत कोसळत होता. हंगेरी कम्युनिस्ट हुकुमशहाच्या मुठीत आवळला गेला. संप आणि पक्षोपपक्षांतील लढे यांनी ग्रासलेला इटली गलितगात्र होऊन मुसोलिनीच्या हाती सापडला. घटनेप्रमाणे युगोस्लावियात राजा असला तरी राज्यकारभार लोकनियुक्त पार्लमेंट चालवीत असे; पण हे सर्व कागदोपत्री राहून देशावर सर्बस् वंशाची हुकुमशाही सत्ताच राज्य चालवीत होती.

गरीब जनता भाकरीला महाग झाली होती. काळ्या बाजारात मात्र सर्व काही मिळत असे. कारखानदारीत संपाचा सुळसुळाट झाला होता. दहा औद्योगिक कामगारांपैकी ९ बेकार होते. एकूण प्रजेच्या १/३ संख्या असलेल्या सर्बियन्स लोकांचेच फक्त हितसंबंध जपले जात होते असे नव्हे तर क्रोटस् आणि स्लोवन्सना अपमानास्पद वागणूक मिळून त्यांच्यावर अन्याय होत होता. अति डाव्या गटाच्या कम्युनिस्टांना सार्वजनिक जीवनातून उठवले होते. १९२० मध्ये तर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींपैकी ५३ कम्युनिस्टांना पार्लमेंटमध्ये जायला मज्जाव करण्यात आला. स्वतः जोसेफ ब्रॉझ ( टिटो ) हा क्रोट आणि कम्युनिस्ट असल्याने प्रस्थापित सरकारबद्दल त्याला प्रेम असण्याचे काहीच कारण नव्हते. यामुळे तो कडवा क्रांतिकारक आणि सरकारचा कट्टर विरोधक झाला. १९२१ साली एक संप घडवून आणल्याबद्दल ब्रॉझला कामावरून काढून टाकण्यात आले.

याच वेळी गृहमंत्री द्राष्कोविच्र याचा खून झाला आणि राजा अॅलेक्झांडरवर प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. कम्युनिस्ट पक्ष बेकायदेशीर ठरला. सहाजिक ब्रॉझ आणि त्याचे सहकारी यांना भूमिगत होऊन चळवळ चालू ठेवणे भाग पडले.

१९२० पासून पुढे कामगारांच्या ट्रेड युनियन्स उभ्या करणे, कम्युनिस्टांचे गट ( Cells ) स्थापन करणे अशा धोकेबाज कामगिरीत तो धडाडीने पुढाकार घेऊ लागला. परिणामी १९२४ मध्ये त्याला अटक झाली. त्याच्या गृहजीवनात तर उन्हाळाच होता. त्याचे

पहिले अपत्य मृतावस्थेतच जन्माला आले. तिसरा मुलगा २ वर्षांचा होऊन वारला तर चौथा आठव्या दिवशीच! रहाता राहिला दोन नंबरचा मुलगा. तो मोठा झाला. दुसऱ्या महायुद्धात लाल सेनेकडून लढताना स्टालिनग्राडच्या युद्धभूमीवर त्याला एक हात गमवावा लागला.

१९२० ते ३० या कालखंडातील युगोस्लावियातील कम्युनिस्ट पार्टीची एक संघटना या दृष्टीने, फारच शोचनीय स्थिती होती. पार्टी पॉलिसीच्या बाबतीत मतामतांचा काही मेळच नव्हता. पोलिसांच्या हस्तकांचा आतल्या वर्तुळापर्यंत प्रवेश झालेला होता. पुढे पुढे तर इतर देशांतून हद्दपार झालेल्या व्यक्तींचा प्रभाव वाढत गेला. आश्चर्य म्हणजे एका विश्वासघातकी सभासदाकडे सतत पाच वर्षे पक्षाचे नेतृत्व होते. अशा या पार्टीत अत्यंत कठोर आणि लष्करी बाण्याच्या पुढाऱ्याचे स्थान ब्रॉझकडे आपोआपच आले. तो काही काळ गोदीकामगार असताना तेथे संप घडवून आणल्याबद्दल त्याला सात महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. सुटून आल्यावर पुन्हा रेल्वेमध्ये तो कामाला लागला, तरी कामगार युनियन्सचे त्याचे कार्य जोमात चालू होते. १९२६ मध्ये तो 'क्रोट मेटल वर्कर्स' युनियनचा सेक्रेटरी म्हणून निवडून आला.

पुन्हा अटक करून त्याला तुरुंगात डांबण्यात आले. या खेपेस मात्र सर्व पोलिसांच्या रानटी वागणुकीचा निषेध म्हणून त्याला उपोषण करावे लागले. सूडबुद्धीने कारभार करणाऱ्या बेलग्रेडच्या सरकारचे स्वरूप बदलून युगोस्लाव्हिया पोलिसी राज्याच्या जुलमाखाली रगडला जाऊ लागला. या राज्याचा गुण एकच होता तो म्हणजे अकार्यक्षमता! पण १९२८–२९ मध्ये ब्रॉझ आणि युगोस्लाविया या दोन्हीच्या दृष्टीने आणीबाणीचा क्षण जवळ आला. ब्रॉझला या वर्षात थोड्या कालावधीत दोनदा पकडण्यात आले; पण दुसऱ्या खेपेस ऐन मोक्याच्या क्षणी तो कारावासातून बाहेर आला.

हा क्षण युगोस्लावियाच्या राजकारणाला कलाटणी देणारा ठरला. बेलग्रेड शहरात तर दंगे चालूच होते. मजल रक्तपात होण्यापर्यंत गेली. निदर्शने आणि दंगे यांची परिणती म्हणजे प्रत्यक्ष पार्लमेंट हाउसमध्ये क्रोटपुढारी स्टीफन रादिक आणि त्याचे तीन सहकारी यांना कंठस्नान घालण्यात आले. निदर्शकांना शस्त्रास्त्रे वाटत असतानाच एक वेळ ब्रॉझ पोलिसांच्या गराड्यात सापडला; पण हा पठ्ठ्या ५–६ व्या मजल्यावरच्या खिडकीतून उडी मारून पोलिसांच्या हातून निसटला! त्याचे नशीब बलवत्तर म्हणून त्याला काहीही इजा झाली नाही; पण त्याला पकडण्यात पोलिसांना यश आले. त्याच्या फ्लॅटच्या झडतीत बाँब सापडले. त्याच्या तपासणीच्या काळात सतत आठ दिवसरात्री त्याला जागा ठेवून प्रखर दिव्यांच्या झोतात प्रश्नांचा भडिमार त्याच्यावर चालू ठेवला होता. अधूनमधून चौदाव्या रत्नाचा प्रयोग होताच. या अनुभवांचे नंतरच्या काळात वर्णन करताना टिटो म्हणतो, 'या प्रयोगाला छळणूक म्हणता येईल की नाही मला माहिती नाही; पण माझे हातपाय, छाती आणि डोके काळेनिळे झाले होते हे मात्र खरे!'

त्याच्या तपासणी-अधिकाऱ्यांना ब्रॉझला वठणीवर आणण्यात यश आले नाही तेव्हा त्याला कोर्टासमोर उभे करण्यात आले. कोर्टात तर त्याने सनसनाटी धमाल उडवून दिली. त्याची त्याला फार मोठी किंमत मोजावी लागली. त्याने न्यायमूर्तींना मी मानत नाही असे सांगून कोर्टावरच हल्ला चढवला. 'माझा न्यायनिवाडा करायला हे कोर्ट पात्र नसून मी कम्युनिस्ट पार्टीखेरीज कोणतीच सत्ता मानत नाही!' असा रोखठोक जबाब त्याने दिला. देशभरच्या वृत्तपत्रांनी त्याच्याबद्दल हेडलाइन्स टाकून अग्रलेखही लिहिले; पण या सर्वांची किंमत म्हणून त्याला ६ वर्षांच्या कारावासाची सजा भोगावी लागलीच. वैवाहिक जीवन जवळजवळ संपलेच. त्याची पत्नीही कम्युनिस्ट होती. तिच्या भाषेतील रशियन शब्दोच्चार आणि रूपातला परदेशीपणा यामुळे तीही पोलिसांच्या 'वाँटेड'च्या काळ्या यादीत होती. अखेर तिच्या ६ वर्षांच्या मुलासह तिला गुप्तपणे रशियात सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले.

या ठिकाणी ब्रॉझ पतिपत्नींच्या वैवाहिक जीवनाची अखेर झाली. ब्रॉझ हा तुरुंगात होता म्हणून वाचला असे म्हणण्यासारख्या घटना पुढच्या वर्षात १९२९ मध्ये घडून आल्या. राजा ॲलेक्झांडरने लष्कराच्या पाठिंब्याने सर्व सत्ता आपल्या हाती घेऊन राज्यघटना गुंडाळून ठेवली. क्रमाक्रमाने धोकेबाज शत्रूंचा नायनाट करण्यास त्याने सुरुवात केली. पोलिसांनी अनेक कम्युनिस्ट पुढाऱ्यांचे पद्धतशीरपणे खून पाडले; पण ब्रॉझ मात्र राजकीय कैदी होता म्हणूनच बचावला असे म्हणावे लागेल. कम्युनिस्ट पार्टीच्या लोकांनी तुरुंगातील त्याच्या छळाची भयंकर वर्णने केली आहेत. त्यात ११ दिवसांच्या उपवासाचाही समावेश होता.

तुरुंगात बरोबरीने शिक्षा भोगणारात फार महत्त्वाच्या काही व्यक्ती होत्या. यात चित्रकार आणि बुद्धिवादी पिजादे होता. त्याला १४ वर्षांची शिक्षा झाली होती. याने तर तुरुंगातही कम्युनिस्ट अभ्यासगट चालविला होता, इतकेच नव्हे तर तुरुंगाचे काही अधिकारीही सामील करून घेतले होते! दुसरा कार्डिली होता, तो भविष्य काळात टिटोच्या मंत्रिमंडळात परराष्ट्रमंत्री होता. पिजादेने तुरुंगात सुद्धा एक छोटे ग्रंथालय तयार केले होते. त्या सर्व ग्रंथांचे आणि विशेषतः कार्ल मार्क्सच्या दास कॅपिटलचे पारायण केले. सर्व पुस्तके फार डोके लढवून आणि धोकाही पत्करून लपवून ठेवलेली असत.

ब्रॉझची पुन्हा १९३४ मध्ये मुक्तता झाली; पण सर्वच युगोस्लाव शहरात प्रवेश करण्यास त्यास मज्जाव होता. या काळापर्यंत गुप्त कारवाया, गुप्त बैठका आणि कट करण्यात तो तरबेज झाला होता. पार्टीचे असे अनेक मेळावे आणि बैठका डोंगरदऱ्यांतून, जंगलभागातून तो संघटित करत असे. या लोकांमध्ये सरकारी खबरे, हेर किंवा मुद्दाम लोकांना चिथावणी देणाऱ्या हस्तकांचाही समावेश असे. या गुप्त चळवळी करत असतानाच्या काळात मिलावन जिलासची आणि त्याची भेट झाली. कालांतराने तो ब्रॉझचा सहकारीही झाला; पण पुढे टिटोच्या दडपशाहीवर उघडउघड टीका केल्यामुळे त्याचा बळी घेतला गेला. जिलास तुरुंगात असतानाच त्याचा ग्रंथ गुप्तपणे अमेरिकेत नेऊन छापण्यात आला. पुढे वीस वर्षेपर्यंत जिलास आणि त्याचा ग्रंथ गाजत राहिला!

ब्रॉझने 'टिटो' हे नाव धारण करण्यापूर्वी वेळोवेळी प्रसंग पाहून अनेक नावे घेतली आणि सोडून दिली. आता मात्र ब्रॉझ हे नाव अस्तंगत होऊन 'टिटो' हे नाव सर्वमुखी होऊन बसले. कम्युनिस्ट चळवळीसाठी देशोदेशी जाताना निरनिराळी नावेच काय पण वेग-

वेगळे पोशाख, मेकअप आणि राष्ट्रीयत्वही त्याने धारण केली. अशा रीतीने १९३७ साली तो फ्रान्समधून परत आला तेव्हा 'टिटो' हे नाव कायम झाले.

### खळबळजनक काळ

१९३५ ते ३७ या दोन वर्षांत प्रत्यक्ष मॉस्कोमध्ये पार्टीच्या खर्चाने पक्षाच्या तत्त्वज्ञानाचे नेतृत्वाचे खास शिक्षण घेण्यासाठी टिटोची निवड करण्यात आली. हे प्रशिक्षण त्याने जरी घेतले तरी प्रथमपासूनच युगोस्लावियाच्या कम्युनिस्टपार्टीच्या धोरणात, कारभारात कॉमिटर्नने (Communist International organisation) हस्तक्षेप करण्यास तो कसून विरोध करीत असे आणि कॉमिटर्न तर पूर्णपणे मॉस्कोच्या छापाखाली होती. त्यातही बल्गेरियन कम्युनिस्टांचा फार मोठा भरणा होता. बल्गेरियन आणि युगोस्लावस हे तर एकमेकांचे प्रतिस्पर्धी आणि कट्टर शत्रू होते. स्टालिनची पक्षशुद्धीकरणाची मोहीम (Great Stalin Punge) आता कोठे सुरू झाली होती. टिटोचे नाव शुद्धीकरणाच्या यादीत निश्चितच होते. त्याला फाशीवर चढवण्यात यावे यासाठी बल्गेरियन कम्युनिस्टांनी सर्व बाजूंनी रान उठवले होते.

१९३० पासून पुढच्या दशकामध्ये युरोपातील निरनिराळ्या राष्ट्रांतील क्रांतीचे रूपांतर महाभयंकर युद्धात होणार अशी चिन्हे दिसू लागली; परंतु या युद्धाचे स्वरूप कसे राहील याचे आकलन कोणासच झाले नव्हते. तरीही १९१७ मध्ये रशियात कम्युनिस्ट राजवट आणि १९२२ ला इटलीत फासिस्ट राजवट आल्यापासून डाव्या व उजव्या शक्तींच्या संघर्षाचे स्वरूप थोडेसे अतर्क्य होणार हे सर्वांस जाणवले होते. फ्रान्स आणि ब्रिटन यांची लोकशाही जुनाट आणि उतरतीला लागल्यासारखी, कणखरपणा संपल्यासारखी भासू लागली होती. अमेरिका फार दूर आणि अलिप्त होती. युरोपातील देश एकामागून एक हुकुमशहांच्या सत्तेखाली किंवा पोलिसी राजवटीखाली येत होते. सर्वांत शेवटी जर्मनीवर तर भयंकर शक्तिशाली, अतिमहत्त्वाकांक्षी, निर्दय अशा फासिस्ट हिटलरने कबजा केला !

स्पॅनिश यादवी युद्धभूमीचा इतर सर्व राष्ट्रे भविष्यकाळात होऊ घातलेल्या महायुद्धाच्या प्रायोगिक भूमीसारखा उपयोग करून घेत होती. टिटोही स्वस्थ बसलेला नव्हता. त्यानेही आपले शेकडो स्वयंसेवक सुप्रसिद्ध 'अंडर ग्राउंड रेल्वे'च्या मार्गे इंटर नॅशनल ब्रिगेडतर्फे लढण्यासाठी पाठविले. त्यातले अनेक मारले गेले, असंख्य फ्रान्सच्या युद्धबंदी छावण्यांत दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीपर्यंत खितपत पडले; पण गनिमी लढाईत तरबेज असलेले जगले-वाचले ते टिटोच्या छत्राखाली युगोस्लावियात परतले आणि कम्युनिस्ट विरुद्ध फासिस्ट संघर्षासाठी सिद्ध होऊ लागले.

पण त्यांच्या कल्पनाशक्तीच्या पलीकडची घटना १९३९ मध्ये घडली. ती म्हणजे नाझी-सोविएत-करार ! कट्टर फासिस्ट हिटलर आणि कडवा कम्युनिस्ट स्टालिन यांनी एकमेकांना आलिंगन दिले. या दोघांनी मिळून पोलंड देश गिळंकृत केला. मध्यंतरीच्या काळात फ्रान्स, ब्रिटन आणि इतर लोकशाही राष्ट्रे फासिस्ट जर्मनी-इटली यांच्या विरोधात एकत्र आली होती.

टिटोसहित सर्व निष्ठावान कम्युनिस्ट या घडामोडीमुळे गोंधळून गेले होते. कम्युनिस्ट चळवळीतली निष्ठा आणि शिस्त अभंग आणि 'मॉस्कोमधले नेते सर्वज्ञ आहेत' ही भावना इतकी जबरदस्त होती की, टिटो आणि सर्व कम्युनिस्टांनी हिटलर-स्टालिन-कराराचे समर्थन करून गोडवे गायला सुरुवात केली. यामुळे हिटलरच्या नाझी सैन्याची धाड रशियावर कोसळवण्याचा पश्चिमी शक्तींचा डाव फसला.

कम्युनिस्ट विचाराच्या टिटोच्या सहकाऱ्यांनी स्टालिनचा पाठपुरावा केला; पण खरे भय इटली आणि जर्मनी यांचेपासूनच आहे हे ते पक्के जाणून होते. त्याचे प्रत्यंतर म्हणजे १९४० मध्ये बर्लिन आणि मॉस्कोचे संबंध बिघडत चालले. पूर्वेकडे दिग्विजयासाठी जाण्याची तयारी म्हणून हिटलरने छोटी छोटी बाल्कन राष्ट्रे पादाक्रांत केली. यात युगोस्लावियाची पाळी सुरुवातीलाच आली. हिटलरने अचानक आणि तडाखेबंद बाँबहल्ले राजधानी बेलग्रेडवर केले तेव्हा मात्र युगोस्लावियन लोकांनी शौर्याची शर्थ करून जर्मनांना त्यांच्या अपेक्षेपेक्षा जास्त काळ थोपवून धरले; पण 'जर्मन टोळधाडीपुढे ते किती टिकाव धरणार ? युगोस्लावियाचा विरोध कोलमडला आणि सिमोविचने त्याच्या सरकारसह लंडनमध्ये आश्रय घेतला आणि जर्मनांविरुद्ध सर्व लोकांचा संघर्ष चालू ठेवण्यासाठी जनरल मिलेलोविच यास मागे ठेवले.

महायुद्धामध्ये भरडून निघालेल्या पोलंड-रशियासहित सर्व देशांच्या मानाने युगोस्लावियाला सर्वांत जास्त झळ पोचली. असे का घडले हे पहाणे हे फार बोधप्रद होईल. याचे कारण म्हणजे युगोस्लावियातली लढाई ही एकच लढाई नव्हती तर तिच्या पोटात अनेक लढाया किंवा गुंतागुंतीचे संघर्ष पेटले होते. एकीकडे आक्रमक जर्मन आणि युगोस्लाव सरकार यांचा तर सरळ सामना होताच. कॅथॅलिक क्रोटस् आणि सनातनी सर्बस् यांचा पूर्वापार झगडाही चालू होता. यांच्या जोडीला कम्युनिस्ट नेतृत्वाखालील क्रांतिकारक गनिमी पार्टिझान्स हे परकीय जर्मन आणि उजव्या विचाराचे स्वकीय सरकार यांच्याशी एकाच वेळी मुकाबला करत होते. या शेवटच्या प्रकारची लढाई लढावी लागणार याची खूणगाठ स्वत: टिटो आणि त्याच्याचसारखे इतर देशातील क्रांतिकारकनेत्यांनी बांधली होती. परकीय सत्तेशी लढत असताना जेव्हा देशांतर्गत यादवी युद्ध होते तेव्हा ते नेहमीच फार भयकारी,रक्तपात घडवणारे, यातनामय असते. युगोस्लावियात १९४१ ते १९४५ या काळात झालेले युद्ध असेच भयकारी आणि दुर्दैवी होते. फिट्जिराल्ड मॅक्लिन या लढाईचे वर्णन 'शौर्य आणि विश्वासघात, परस्पर वैर आणि कटकारस्थाने यांचा जणू कॅलिडोस्कोपच तयार झाला होता.' असे करतो. तो पुढे म्हणतो, 'जिकडे पहावे तिकडे जुनाट वंशभेद, धर्मभेद आणि राजकीय वैर यांनी विक्राळ स्वरूप धारण केले होते. लढाई आणि विशेषत: परकीयांचे आक्रमणाला राष्ट्रवाद्यांनी केलेला कडवा विरोध यामुळे जाळपोळ झालेली गावे, भग्न झालेल्या चर्चेसच्या इमारती, ओलीस ठेवून घेतलेल्यांच्या कत्तलो आणि छिन्नविच्छिन्न झालेले मृतदेह याखेरीज नजरेस दुसरे काहीही दिसत नव्हते !'

१९४१ ला नाझींनी बेलग्रेडमध्ये स्वत:चे लष्करी शासन स्थापन केले. क्रोशियामध्ये मात्र राजा अॅलेक्झेंडरच्या मारेकऱ्यांपैकी एक

म्हणजे पावलिच (Pavelich) याच्याच सत्तेला त्यांनी पाठिंबा दिला. तो फासिस्ट असून चर्चची सत्ता मानणारा आणि सर्व विरोधी होता.

अनेक सर्व शेतकऱ्यांनी डोंगरी भागात आसरा घेऊन त्यांच्याशी गनिमी युद्ध चालू ठेवले. त्यांना कम्युनिस्टगट येऊन मिळाले आणि अशा रीतीने ज्याला पार्टिझन वॉर म्हणतात ती सुरू झाली.

टेलेफोनच्या आणि विजेच्या तारा तोडणे, पूल उध्वस्त करणे, हँगर्समध्येच विमानांना आगी लावणे, जर्मन लॉऱ्या आणि विशेषत: वृत्तपत्रांच्या कचेऱ्या पेटवून देणे असा धुमाकूळ आरंभला. जर्मनांच्या छोट्या छोट्या तुकड्यांची लांडगेतोड करायची; पण फार मोठ्या शिबंदीच्या वाटेला जायचे नाही अशा धोरणाने ते लढत. कोणताही प्रदेश मुक्त झाला की कम्युनिस्टांचा भरणा असलेल्या लोकसमित्या ते लगेच स्थापन करत असत.

एखादे गाव तात्पुरते ताब्यात आले असेल तर त्याचा फायदा घेऊन पोलिसस्टेशन, कोर्टकचेरी आणि टॅक्सेस आणि जमिनीं-संबंधीचे रेकॉर्ड हे आगी लावून नष्ट करण्याचा त्यांचा खाक्या होता. म्हणजे कोणतीही सत्ता पुन्हा तेथे आली तर कारभार करणेच अशक्य व्हावे. अशा प्रकारच्या गनिमी युद्धात लॉऱ्या आणि टँक्स यांचा काहीच उपयोग होत नसे. म्हणून त्यांच्या शत्रूने लोकांमध्ये भय उत्पन्न होईल असे शस्त्र बाहेर काढले. उदाहरणच द्यायचे झाले तर गनिमांनी क्रागुजेवाक (Kragujevak) जवळ एक लष्करी आग-गाडी उडवली. त्यात ५० जर्मन सैनिक ठार झाले आणि शंभरावर जखमी झाले. याचा बदला म्हणून त्या गावातले १४ ते ६० वर्षे वयांचे सर्व पुरुष–एकूण जवळजवळ ९०००–एकत्र करून, त्यांच्यावर मशीनगन्सचा मारा करून त्यांची कत्तल केली गेली. साठ वर्षांवरचे काही वृद्ध शिक्षक आपल्या वर्गातल्या विद्यार्थ्यांबरोबर स्वच्छेने मृत्यूला सामोरे गेले. अशांवर गोळी चालवण्यास ज्या जर्मन सैनि-कांनी नकार दिला त्यांना गोळ्या घातल्या गेल्या!

कॅथलिक असलेल्या क्रोटस्नी तर निर्दयतेची परिसीमा गाठली. कॅथलिक नसलेल्या सनातनी सर्बसचा त्यांनी अमानुषपणे सूड उगवला. प्रार्थनेसाठी चर्चेसमध्ये एकत्र आलेल्या सर्बस्ना, चर्चेसना आगी लावून आतल्या आत जाळून टाकले. एवढ्याने भागले नाही म्हणून की काय, मॉव्हेकिचे नाझी आणि जेरुसलेमचा मुफ्ती यांनी बॉस्नियातल्या मुस्लिमांना कम्युनिस्टांचे शिरकाण करण्याला प्रोत्सा-हन दिले.

युगोस्लावियाचे मूळचे सरकार लंडनमधून त्यांच्या वतीने मिले-लोविचच्या नेतृत्वाखालील सर्ब आर्मीच्या (चेटनिक्स) बळावर नाझींना विरोध करत होतेच; पण जसजसे दिवस जाऊ लागले तस-तसे अखेरीस आपला खरा शत्रू जर्मनी नसून स्वकीय असलेले कम्युनिस्ट पार्टिझनच आहेत अशी त्या सरकारची खात्री पटली. दैवदुर्विलास म्हणजे नाझी जर्मनांकडून शस्त्रास्त्रे मिळवून ते आपल्याच देशबांधवांशी यादवी युद्ध करू लागले.

पार्टिझान्सना शस्त्रसंभार कोठून मिळणार? तर त्यांनी लढ्याची सुरुवात शॉटगन्स आणि कुऱ्हाडी यांनीच केली. हळहळू जर्मन आणि इटालियन रसदीवर छापे मारून त्यांनी आपले शस्त्रागार वाढविले. यानंतर मात्र त्यांनी दोन आघाड्या उघडल्या. एक म्हणजे मुक्त केलेल्या प्रदेशातून खड्या सैनिक तुकड्यांनी लढायचे आणि दुसरे म्हणजे जर्मनांच्या पिछाडीस जाऊन गनिमी छापेमारी करायची.

ब्रिटनने लंडनमधल्या युगोस्लावियन निर्वासित सरकारशी औप-चारिक संबंध ठेवले होते तरी १९४३ पासून त्यांनी टिटोच्याच सैन्याला शस्त्रसामग्री पुरवायला सुरुवात केली. लढ्याचे सूत्रचालन बरोबर चालावे आणि टिटोशी प्रत्यक्ष संपर्क साधता यावा म्हणून चर्चिलने ब्रिगेडियर फिट्झिराय मॅक्लीन याला पॅराशूटने टिटोच्या गोटात उतरवले.

फिट्झिराय मॅक्लीन म्हणतो, पॅराशूटने ज्या शेतात मी रात्रीच्या काळोखात उतरलो तेव्हा माझ्या नजरेस कोणीच आले नाही. थोडा पुढे जाताच जर्मन गणवेश घातलेला एक सैनिक सबमशिनगन घेऊन सामोरा आला. त्याचा वापरलेला जुना गणवेश पाहून मला थोडा धीर आला आणि आधीच ठरलेला सांकेतिक शब्द मी उच्चारला. 'ड्राव्हो' या शब्दाची जादू अशी की त्याने मशिनगन खाली टाकली आणि मला कडकडून मिठी मारली. मागेच असलेल्या आपल्या साथीदारांना अत्यानंदाने तो म्हणाला, 'अरे, मला जनरल सापडला!' तावडतोब माझ्याभोवती तरुण पार्टीझान्सनी कोंडाळे केले. ओळख पटली आणि आम्ही नजीकच्या त्यांच्या तळावर दाखल झालो.'

## कठोर शिस्त, कल्पकता

टिटोचे नेतृत्व इतके कल्पक आणि धाडसी होते की मोठ्या सेने-पेक्षासुद्धा त्याच्या गनिमी सैनिकांची जर्मनांनी धास्ती घेतली होती. नाझींच्या सरकारी यंत्रणेत टिटोच्या सैनिकांनी इतक्या खोलवर शिरकाव केला होता की जर्मनांच्या गुप्त वार्तापत्रांची रोजची ताजी प्रत टिटोच्या हाती पडत असे. पुढे पुढे टिटोचा इतका आत्मविश्वास वाढला की, साक्षात बेलग्रेड शहरातच त्याने आपली मुख्य कचेरी (Head quarters) स्थापन केली. त्याचे सैनिक मात्र दूरदूरच्या प्रदेशात गटागटाने विखुरलेले असत. या लढाईतील पार्टिझान सैनिकांची आपल्या ध्येयावरची असीम निष्ठा हा युगोस्लावियात गौरवगाथेचा एक विषय झाला असल्यास नवल नाही. सर्वजण स्वेच्छेने सामील झालेले स्वयंसेवक होते. त्यापैकी २५% तरुण महिला होत्या. सर्वांना सांधणारे राष्ट्रप्रेम आणि पक्षनिष्ठा ही दोनच सूत्रे होती. त्यामुळे त्यांच्यात मूळचीच असलेली शिस्त आणखी कडक झाली असल्यास नवल नाही. देशरक्षणाचे कंकण बांधलेल्या या व्रतस्थ सैनिकांना तीन नियमांचे फार काटेकोरपणे पालन करावे लागत असे. लूट करायची नाही आणि दारूला स्पर्श करायचा नाही. याच्या जोडीला स्त्रीपुरुषप्रेमाने पाघळून जायचे नाही, याही नियमाचे पालन होत असे. माओ त्से तुंगच्या गनिमी सैन्याशीच याची तुलना होऊ शकेल.

अशा व्रतस्थ वृत्तीच्या शिस्तबद्ध संघटनेमुळे कम्युनिस्ट पक्षाची प्रतिष्ठा आणि जनमानसावरील वजन फार वाढले; पण हे साध्य होताना १९३९ मध्ये असलेल्या १२००० सभासदांपैकी ९००० ना आपली प्राणाहुती द्यावी लागली. असे असूनही पक्षाला जीवन-समर्पित केलेल्यांची संख्या युद्ध संपण्याच्या सुमारास पाच लाखांपेक्षा कमी नव्हती. या संग्रामात भाग घेतलेल्यांच्या व्यक्तिश: झालेल्या हालअपेष्टा, उपासमार आणि इतर यातना याला तर सीमाच

नव्हती. त्यांच्यामुळे घरच्या आप्तेष्टांच्या शत्रूने केलेल्या छळालाही तोड नव्हती !

हे सर्व जरी खरे असले तरी उत्कृष्ठ प्रतीच्या नेतृत्वाशिवाय या विषम प्रकारच्या लढाईत यश मिळणे जवळजवळ अशक्यच. रणधुमाळी चालू असताना अत्यंत धोक्याच्या ठिकाणीही टिटो स्वतः जातीने हजर असे. एकदा तर तो ज्या इमारतीत होता त्यावरच एक बाँब आदळला; पण स्फोट न होता सीलिंगच्या तुळईमध्ये अडकून बसला. दुसऱ्या एका प्रसंगी इटालियन फलटणीच्या अनपेक्षित आलेल्या हल्ल्याचे वेळी त्याने आपल्या तुकडीतील बहुसंख्य लोकांना तडकाफडकी जलदीने माघार घ्यायला लावून स्वतः मोजके लोक हाताशी ठेवून पिछाडीच्या रक्षणासाठी मशीनगनचा मोर्चा लावला. तिसऱ्या खेपेस त्याच्या खुद्द हेडक्वार्टर्सवर झालेल्या छत्रीधारी सैनिकांच्या हल्ल्यातून मोठ्या शर्थीने तो वाचला. क्रांतिकारी सेनेचं सर्वोच्च नेतृत्व निर्विवादपणे त्याच्याकडेच होते. त्याच्या भोवताली असलेले सहकाऱ्यांचे मंडळही तितक्याच योग्यतेचे होते.

त्यामुळे युद्ध संपून सत्ता हाती घेताना तावूनसुलाखून निघालेले मंत्रिमंडळ त्याच्या हाताशी जय्यत तयारच होते. त्याची प्रभावळ म्हणजे कार्डेली रँकोविच आणि जिलास हे कॅबिनेट मिनिस्टर्स, सेक्रेटरीचे काम संभाळणाऱ्या दोन तरुणी–झेंका ही दिसायला लहानखोरी आणि तऱ्हेवाईक; पण अत्यंत कडवी तर ओल्गा ही सतत कमरपट्ट्याला पिस्तूल लटकावून वावरणारी, उंचीपुरी आणि बळकट बांध्याची, स्वच्छ इंग्लिश बोलणारी. याशिवाय दोन विश्वासू शरीररक्षक आणि लांडग्यासारखा दिसणारा उंचापुरा 'टिग्गर' जवळ उभा असला म्हणजे पंचायतन पूर्ण झाले.

फिट्जिरॉय मॅक्लीनचा टिटोशी फार जवळून संबंध आला. त्याला दिसलेला टिटो म्हणजे 'सहकाऱ्यात उभा राहिला म्हणजे सर्वांच्या खांद्या-डोक्याच्यावर त्याची हातभर उंची उठून दिसे. त्याचा विशाल दृष्टिकोन हा खरोखरी आश्चर्यकारक असे. त्याची विनोदबुद्धी त्याला सतत साथ देते. जीवनातल्या छोट्याछोट्या गोष्टींपासून मिळणाऱ्या सुखाचा आस्वाद घेण्यास त्याला यत्किंचितही संकोच वाटत नसे. स्वभाव मात्र तापट आणि त्याचा भडका केव्हा उडेल याचा नेम नाही; पण त्याचबरोबर सहकाऱ्यांच्याबद्दलचा जिव्हाळा आणि उदारपणा याला कमतरता नसे आणि ते तो बारिकसारिक गोष्टींतून व्यक्त करी. कोणत्याही प्रश्नाच्या दोनही बाजूंचा विचार करण्याची त्याच्या मनाची ठेवण विलक्षण म्हणायला पाहिजे; पण तरीही त्याच्याशी व्यवहार करताना तो स्वतःचा हेतू साधण्यासाठी डावपेचांच्या किंवा हिसाचाराच्या कोणत्याही टोकाला जायला कमी करणार नाही, हे विसरून चालत नसे.

टिटोच्या यशाचे थोडक्यात रहस्य सांगायचे झाल्यास ध्येयावरील अटळ निष्ठा, अत्यंत कठोर असा निश्चयीपणा, शिस्तीच्या बाबतीत दयामाया किंवा तडजोड याला अवसर नाही; सर्वांत महत्त्वाचे म्हणजे निःस्वार्थ समर्पण, असे सांगता येईल.

वरील सर्व गुणांच्या जोरावर मुळात सुरू झालेल्या युद्धाची संपूर्ण क्रांतीमध्ये परिणती झाली. हे यश जगात अजोड आहे. युद्धाच्या होमकुंडात तावूनसुलाखून निघाल्यामुळे अत्यंत शिस्तबद्ध, देशाला वाहून घेतलेल्या सर्बस्, क्रोटस्, स्लोवन्स्, माँटेनेग्रीन्स या मुळात एकमेकाला पाण्यात पहाणाऱ्या घटकांशी एका समान शक्तीविरुद्ध आघाडी उभी करून त्यांच्यात एकराष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न करण्यात टिटो यशस्वी झाला.

वर वर्णन केलेले यश मिळण्यापूर्वी थोडेच दिवस युगोस्लावियाला फार मोठ्या अग्निदिव्यातून जावे लागले. लढाईच्या व्यूहरचनेतला एक अपरिहार्य भाग म्हणून जर्मन फौजेने पार्टीझान्सच्या विरुद्ध निरनिराळ्या बाजूने सात वेळा चढाया केल्या. या क्षणी पार्टीझान्सचे लढाऊ सामर्थ्य म्हणजे प्रत्येकाजवळ उरलेली शेवटची तीन काडतुसे. पार्टीझान्सनी मदतीसाठी स्टालिनला अखेरची साद घातली. आज ना उद्या ही मदत येणार या आशेवर माँटेनेग्रीन पर्वताच्या कुशीत, हिमवादळाची पर्वा न करता, हाडे गोठवून टाकणारी थंडी सहन करत, आकाशातून पॅराशूटस्चे पंख लावून येणाऱ्या अन्न आणि हत्यारे यांच्याकडे डोळे लावून ते बसले होते; पण एकही पॅराशूट जमिनीवर उतरले नाही. त्याबदली स्टालिनने टिटोला युद्धातील राजकीय स्वरूपाचा सल्ला दिला की लंडनमध्ये असलेल्या परागंदा सरकारला ब्रिटन आणि रशियाप्रमाणेच मित्र मानून त्यांच्याशी सख्य करावे. टिटोने कंठशोष करून सांगितले की, त्या सरकारचे चेटनिक्स ह्यांनी जर्मन शत्रूशी हातमिळवणी केली आहे; पण तिकडे कोणी लक्षच दिले नाही. शेवटी हताश होऊन टिटोने स्टालिनला रेडिओ संदेश पाठवला की, 'भले आम्हाला मदत करू नको; पण निदान आमच्या मार्गात अडथळे तरी आणू नको!'

पण जर्मनांनी जेव्हा निकराची ४ थी आणि ५ वी चढाई केली त्या वेळी अगतिकपणे कळवळून टिटोने स्टालिनला संदेश पाठवला. 'आम्हाला मदत करण्याची परमेश्वर तुला बुद्धी देवो!' पण व्यर्थ. त्याचे सैनिक टायफसने हैराण झाले होते. स्वतःच्या लाडक्या घोड्यांच्या मांसावर त्याना पोट जाळावे लागत होते. दिवसा लढाई आणि रात्री पायपीट करत पुढचा तळ गाठणे. त्यांच्या संग्रामातली ही अमावास्येची रात्र होती. त्यांची हानी आणि हालअपेष्टा महाभयानक होत्या.

'मॅक्लीन मिशनच्या' आगमनानंतर १९४३ मध्ये इटलीचा पाडाव झाल्यावर सुद्धा टिटोला आपली भूमी सोडून १९४४ मध्ये ॲड्रियाटिकमधल्या 'व्हिस' या छोट्या बेटावर आसरा घ्यावा लागला; पण इटलीच्या आघाडीवरचा ताण कमी होताच अँग्लो–अमेरिकन मदतीचा ओघ सुरू झाला. एक लाख रायफल्स, पन्नास हजार मशीनगन्स, बाराशे मॉर्टर्स आणि इतर अनेक युद्धोपयोगी वस्तू येऊ लागल्या. रॉयल फोर्सनेही आकाशातून जोड द्यायला सुरुवात केली.

इतके होऊनही ब्रिटन आणि अमेरिकेवर टिटोचा भरवसा होता अशातला भाग नाही. उलट स्टालिनकडून अवहेलना होऊनसुद्धा कम्युनिझम आणि सोविएत रशिया यावरचा त्याचा स्वाभाविक विश्वास फार खोलवर रुजलेला होता. कारण या बाबतीतला प्रत्यक्ष धडा मिळण्यासारखी घटना त्याच्या डोळ्यांसमोरच घडली. १९४४ मध्येच ग्रीसमधल्या कम्युनिस्ट पार्टीझन्सनी उठाव करण्याचा प्रयत्न करताच चर्चिलने क्षणाचाही विलंब न करता तो प्रयत्न चिरडून टाकून टिटोच्या दृष्टीने प्रतिगामी भांडवलशाही सरकारची तेथे स्थापना केली. फिट्जिराय मॅक्लीनचे चर्चिलशी या सुमारास झालेले

संभाषण जर टिटोच्या कानांवर पडले असते तर तो ब्रिटनच्या बाबतीत इतका संशयी झाला नसता. त्यांच्या संभाषणात युगोस्लावियातील चेट्निक्स आणि पार्टिझान यांच्या तुलनेचा विषय होता आणि मॅक्लीनने ठामपणे सांगितले की, 'युद्धोत्तर काळात युगोस्लाविया कम्युनिस्ट राहून रशियाकडे झुकेल.'

चर्चिल त्याला विचारतो, "युद्ध संपल्यावरही युगोस्लावियातच स्थायिक होण्याचा तुझा विचार आहे की काय?"

'तसे कसे होईल?' मॅक्लीन.

चर्चिल, 'माझाही तसा विचार नाही. तेव्हा आपण दोघांनीही युद्धानंतर युगोस्लावियात कोणत्या विचाराचे सरकार येईल याची चिंता करण्याचे कारण नाही. तो त्यांचा घरचा प्रश्न आहे. आपला मतलब एवढाच आहे की त्या दोघांपैकी जर्मनांची हानी कोण जास्त करू शकतो.'

वरील मार्गदर्शक धोरणानुसार मेहेलोविच्च्या चेट्निक्सना मिळणारी मदत १९४४ च्या वसंतऋतूत थांबविण्यात आली.

१९४४–४५ हे वर्ष संपूर्ण जगाच्या दृष्टीने ऐतिहासिक महत्त्वाचे ठरले. जर्मनी आणि जपान यांचा निर्णायक पराभव झाला. युरोपमध्ये रशियाच्या विजयी फौजा पोलंड, बल्गेरिया, रुमानिया, हंगेरी आणि पूर्व जर्मनी अशा एकामागून एक देशांमध्ये कम्युनिस्ट सरकारांची प्रतिष्ठापना करीत होत्या. चीनमध्ये माओच्या कम्युनिस्ट सैन्याची परकीय शत्रू जपान आणि स्वकीय शत्रू चांग–कै–शेक यांच्याविरुद्ध आगेकूच होऊन ते एकामागून एक प्रदेश पादाक्रांत करीत होते. ग्रीसमध्ये चर्चिलने कम्युनिस्टांना डोके वर काढू दिले नाही, तर पाश्चिमात्य सत्तांचा प्रभाव आणि सामर्थ्य यामुळे कम्युनिस्टांच्या हाती इटली, फ्रान्स आणि पश्चिम जर्मनी या राष्ट्रांची सत्ता जाऊ शकली नाही, १९४४ पूर्वी युरोपच्या कोपऱ्यातल्या युगोस्लावियावर आक्रमण करून रशियाच्या पाठिंब्यावर तेथे सरकार येऊ नये म्हणून प्रयत्न करण्यासाठी अमेरिकेचे मन वळवण्याचा चर्चिलने खूप प्रयत्न केला; पण १९४४ मध्ये चर्चिलची खात्री पटली की युगोस्लावियात कम्युनिझम येणे अटळ आहे.

अर्थात टिटोने याबाबतीत कोणताच धोका पत्करायचा नाही असा निश्चय केला होता. ज्याचा खून झाला त्या राजा अलेक्झँडरचा मुलगा पीटर यास राजा म्हणून युगोस्लावियात परत येऊ देण्याच्या चर्चिलच्या सूचनेस त्याने साफ नकार दिला. १९१८ मध्ये लोकशाही प्रथम आणि नंतर समाजवाद हे जे आपण धोरण ठेवले ते चुकले असे त्यास वाटून आता १९४५ मध्ये मात्र प्रथम समाजवाद (कम्युनिझम) आणि नंतर (जमल्यास) लोकशाही असा पवित्रा त्याने घेतला.

अमेरिकेच्या तथाकथित द्विपक्षीय लोकशाहीवर हल्ले चढवण्यास त्याने सुरुवात केली. त्याच्या मते दोनही पक्षात तसा फरक काहीच नाही. दोन्हीवर सत्ता मात्र बड्या भांडवलदारांची. देश युद्धमान असताना वेळप्रसंग पाहून तो घटनात्मक प्रश्नांची सोडवणूक करत असे. पण आता शांततेच्या काळात कम्युनिस्ट पक्षप्रणीत हुकुमशाही त्याने पत्करली. दुसऱ्या शब्दात 'जनतेची लोकशाही' स्थापन केली. एक गोष्ट मान्य करायला पाहिजे की, युद्धकाळातला लष्करी नेता, सर्व क्रोट–स्लोवन–मॉन्टेनेग्रिन अशा संयुक्त आघाडीचा पुढारी म्हणून टिटो पूर्व युरोपातल्या तथाकथित लोकसत्ता असलेल्या देशांच्या कम्युनिस्ट पुढाऱ्यांच्या तुलनेत खरोखरीच लोकप्रिय होता.

## पुनर्रचना

त्याने एकामागून एक निर्णय घेऊन ८० टक्के उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण केले, ११२ एकरांपेक्षा जास्त असलेली एका कुटुंबाची जमीन सरकारजमा केली. चर्चसाठी असलेल्या जमिनीवर २५ एकरांची मर्यादा घातली आणि इतर काहीजणांबरोबर मिहेलोविचला देहान्ताची सजा केली; पण सर्वच कम्युनिस्ट सत्ताधाऱ्यांना त्रासदायक ठरलेल्या सामुदायिक शेतीच्या बाबतीत मात्र त्याने फार जपून आणि सावकाश पावले उचलली.

त्यांचा देश सर्वच दृष्टीने उध्वस्त आणि ग्रस्त झालेला होता. त्याच्या १ कोट ६० लाख लोकसंख्येपैकी युद्धात १७ लाख माणसे मारली गेली होती आणि लाखो जखमी झाली होती. रोगराई आणि दुष्काळी स्थिती येऊ नये म्हणून हरप्रकारची मदत करणे निकडीचे होते. उध्वस्त झालेली शेती आणि मोडकळीस आलेले कारखाने सरकारी मदतीशिवाय उभे रहाणे अशक्य होते. यापैकी काही वाटा राष्ट्रसंघाने उचलला. यूनोकडून युगोस्लावियाला ४०० कोटी डॉलर्सची मदत मिळाली; परंतु नवीन कारखाने काढायला लागणाऱ्या पैशात जेव्हा आखडता हात घेतला तेव्हा संबंध बिघडले. एकूण मदतीपैकी ७० टक्के मदत अमेरिकेकडून मिळाली; पण मदत देताना मित्रत्वाच्या संबंधाची अट घालण्याची जोरदार मागणी अमेरिकेत होऊ लागली तेव्हा टिटोने त्याला कडाडून विरोध केला. त्याने दाखवून दिले की युगोस्लावियापेक्षा मदतीचा मोठा ओघ हा पराभूत जर्मनीकडे जातो आहे आणि मदत म्हणून मिळणाऱ्या डॉलरबरोबर कोणतेही बंधन घालून घेण्यास त्याने तीव्र विरोध केला. 'टिटोला' कोणीही खरेदी करू शकत नाही असे त्याने ठणकावून सांगितले. ट्रीस्ट (Trieste) प्रकरणामुळे ब्रिटन-अमेरिकेबरोबरचे त्याचे संबंध बिघडले. ट्रीस्ट बंदर म्हणजे ऑस्ट्रियन साम्राज्याचाच भाग होता. तेव्हा ते युगोस्लावियाकडेच रहावयास हवे; होते परंतु इटालियन बहुसंख्य असलेले हे सागरी बंदर, रशियाचे अॅड्रियाटिकवरील मोक्याचे ठिकाण होऊ देण्यास ब्रिटन-अमेरिका राजी नव्हते. आणि याउलट इटलीत असलेले अनेक कम्युनिस्ट दुखावले जातील या भीतीने रशिया युगोस्लावियाची बाजू उघडपणे घेऊ शकत नव्हता. अखेर १९४७ मध्ये एक अमेरिकन विमान पाडण्यात आल्याने युगोस्लाविया आणि अमेरिका यांच्या संबंधाची पूर्ण फारकत झाली आणि मालाच्या निर्यातीच्या बाबतीत युगोस्लाविया पूर्णपणे पौर्वात्य देशावर अवलंबून राहिला.

टिटोने आधीच अमेरिकेशी तंटा केला होता. रोमशी एका वादग्रस्त प्रश्नात तो गुंतला होता. पावेलिचला पाठीशी घालून अर्जेन्टिनात जाण्यास त्यास पोपमहाशयांनी मदत केली असा त्याने उघड आरोप केला. उस्ताशेच्या साथीदारांना त्याने शासन केले. त्यातले बरेच कॅथॉलिक धर्मगुरू होते. उस्ताशेशी संबंधित असल्याच्या आरोपावरून आर्चबिशप स्टेपिनॅकला त्याने कारागृहात डांबले.

या सर्व गोष्टी पूर्व आणि पश्चिम अशा दोन गटात दुभंगलेल्या

जगात घडणे स्वाभाविक होते असे म्हटले तर चूक नव्हते; पण १९४८ मध्ये घडले ते पूर्णपणे अनपेक्षित, आश्चर्यकारक आणि नाट्यमय होते. कम्युनिस्ट जगतामध्ये रशियाचे सर्वश्रेष्ठत्वाबद्दल कधी दुमत नसे आणि रशियनांना या श्रेष्ठत्वाची पूर्ण जाणीव आणि अभिमान असे. कॅथॉलिक्सना जसे व्हॅटिकन तसे कम्युनिस्टांना क्रेमलिन. राजकीय धोरणाबाबत क्रेमलिनकडून कधी चूक होणारच नाही अशी त्यांची धारणा असे. मॉस्कोमधून जे आदेश सुटत, ( मग ते काल-परवाच्या आदेशांच्या अगदी विपरीत का असेनात ) ते शिरोधार्य मानून त्याप्रमाणे कार्यवाही होत असे.

युगोस्लावियाने उद्योगधंद्याला प्राधान्य द्यावे की शेतीला हेही जेव्हा मॉस्कोतून ठरू लागले तेव्हा ते टिटोला मुळीच रुचले नाही. कारण लालसेनेने उभ्या केलेल्या कळसूत्री बाहुल्यांपैकी तो एक नव्हता. त्याने आपल्या देशाची लढाई आपण स्वतः जिंकली होती आणि त्याचे स्थान स्वयंभू होते. रशियन वरचढपणा खपवून घेणारा तो नव्हता आणि रशियन सीक्रेट पोलिसमध्ये युगोस्लाव एजंटस्ची भरती करून युगोस्लावियाच्या यशापयशाबद्दल थेट मॉस्कोकडे रिपोर्टस् जाऊ लागताच तो खवळून उठला.

स्टालिनला टिटोच्या स्वतंत्र आर्थिक किंवा औद्योगिक धोरणा-पेक्षा बाल्कन्सचे नेतृत्व करण्याच्या टिटोच्या महत्त्वाकांक्षेचा राग होता. १९४६–४७ मध्ये युगोस्लाविया, बल्गेरिया, पोलंड, रुमानिया आणि झेकोस्लोवाकिया यांचे एक संघराज्य स्थापण्याची योजना आकार घेऊ लागली होती. स्टालिन अशा तऱ्हेची स्पर्धा खपवून घेणारा नव्हता. कम्युनिस्ट जगताचा एकच पोप असू शकतो. जेव्हा बेलग्रेडमध्ये कॉमिन्फॉर्म स्थापन होऊन त्याचे धुरीणत्व टिटोने स्वतः-कडे घेतले तेव्हा परिस्थिती चिघळली.

स्टालिन आणि टिटो यांच्यात परस्परावर टीका, दोषारोप करणाऱ्या पत्रांची देवाणघेवाण सुरू झाली. मार्च १९४८ मध्ये स्टालिनने टिटोवर जणू रॉकेटच सोडला. कोणी कम्युनिस्ट सोव्हिएट युनियनच्या विरोधात उभा राहू शकतो ही घटनाच त्या सोविएट सेक्रेटरीच्या कल्पनेपलीकडची होती. त्याच्या विचारशक्तीबाहेरचे हे कृत्य होते. युगोस्लावियाची भूमिका अशी की, रशियाचा जो वकील (Ambasador ) येईल तो इतर अनेक राष्ट्रांचे वकील असतात तसाच असावा. त्याने स्वतःकडे गव्हर्नर जनरलची भूमिका घेऊन चालणार नाही. या प्रमादाबद्दल स्टालिनने टिटोला एक कडक खलिता पाठवला. ते करतानाच त्याने इतर कम्युनिस्ट राष्ट्रांना त्याने टिटोला लिहिलेल्या पत्रांच्या प्रती पाठवल्या; पण टिटोच्या प्रत्युत्तराच्या प्रती मात्र दिल्या नाहीत.

या डावाला इतर सर्व आज्ञाधारक कम्युनिस्ट सरकारे बळी पडली आणि जून १९४८ मध्ये कॉमिन्फॉर्मचे खास अधिवेशन भरून त्यात टिटोचे औद्धत्य, महत्त्वाकांक्षा आणि त्याचे दहशतवादी सरकार यांची निंदा करणारा ठराव संमत करण्यात आला. आताशी कोठे जगातले इतर देश डोळे चोळून जागे होऊ लागले; पण त्यांच्या आश्चर्यात भरच पडली.

टिटो हा कोणाच्या ताटाखालचे मांजर होणारा नव्हे. रशियाचे यश, कम्युनिझम स्थापन करणे या सर्वांपेक्षा युगोस्लावियाची एकात्मता आणि अस्मिता यांचा अभिमान आणि स्वसामर्थ्यावरचा असीम विश्वास प्रभावी ठरला. टिटोने त्याच्या आणि स्टालिनमध्ये झालेल्या पत्रव्यवहाराला प्रसिद्धी दिली. इतर इमानदार कम्युनिस्ट देशांच्या दृष्टीने पक्षद्रोहाची ही परिसीमा झाली आणि ते व टिटो यांच्यातली दरी रुंदावली.

स्टालिन ही बंडखोरी निमूटपणे सहन करणारा नव्हता. त्याने आपली तर्जनी वर करावी आणि टिटो होत्याचा नव्हता व्हावा ही त्याची कल्पना. खेरीज असे आणखी कोणी राष्ट्रवादी कम्युनिस्ट असल्यास त्यांनाही परस्पर धडा शिकवावा हा हेतू. त्याचाच भाग म्हणून स्टालिनने तावडतोब शुद्धिकरणास (purges) सुरुवात केली. बल्गेरियात पेटकोव आणि कोस्तोव, हंगरीत रजाक, रुमानियाचा मॅनू यांच्या ट्रायल्स होऊन त्यांना गोळ्या घालण्यात आल्या. झेकोस्लोवाक पार्टी सेक्रेटरी स्लॅंकी याचा शेवट केला. रुमानियन पार्टीपैकी २० टक्के सभासदांना पक्षातून काढून टाकले तर अनेक पुढाऱ्यांना फाशी दिले. रशियन साम्राज्यशाहीच्या निर्दय शक्तीचे पुरेसे प्रदर्शन झाले होते. क्रेमलिनमधील लांडग्याने आणि त्याच्या टोळीतील इतरांनी खूप गुरकावले. आकांडतांडव केले; पण युगोस्लावियाच्या घरावरचे एकाददुसरे कौल फुटण्याखेरीज काही झाले नाही !

स्टालिनने टिटोची आर्थिक नाकेबंदी केली. यामुळे अनेक स्वप्ने आणि योजना बासनात बांधाव्या लागल्या. कमरेचे पट्टे आवळावे लागले आणि गरजेपोटी टिटोला पश्चिमेकडे मोर्चा वळवावा लागला.

यातूनच टिटो हे एक जागतिक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व ठरले. स्वतंत्र राष्ट्रवादी कम्युनिझम–टिटोइझमचा तो प्रणेता झाला !

□

---

**बगाड :** पृष्ठ ८ वरून

राफेल काय, अँजेलो काय, गॉफ्, गोगँ, पिकासो, आंत् कुल्त्यूर आपल्या घराघरात प्रवेश करणार !'

विजय तेंडुलकरही रंगीत टी. व्ही. च्या कल्पनेवर लट्टू आहेत. त्यांचे 'गिधाडे' हे जबरदस्त नाटक आजवर टी. व्ही. वर करता येत नव्हते. कारण त्या नाटकातला तो विख्यात लाल डाग काळ्या पांढऱ्या टी. व्ही. वर इफेक्टिव्ह ठरत नाही. आता लाल डागासकट 'गिधाडे' टी. व्ही. वर येईल आणि केवळ काळा-पांढरा असल्याने टी. व्ही. रंगभूमीच्या किती युगांनी मागे पडला होता याची जनतेला जाणीव होईल. 'फार मोठे सांस्कृतिक कार्य करणार आहे रंगीत दूरदर्शन !' ते गंभीरपणाने आणि द्रष्टेपणाच्या वाणीने म्हणाले.

आमचे इंदिरावादी विचारवंत चांदगूडकर यांनीही रंगीत दूरदर्शनची कल्पना उचलून धरली आहे. 'आजवर आमचे विचार काळ्या–पांढऱ्याच्या द्वैतात अडखळून होते. इतर विविध रंगछटांना आमची दृष्टी पारखी झाली होती. माताजी लोकशाहीच्या पुस्तकी कल्पनांना जखडलेल्या नाहीत, म्हणजे त्या हुकूमशहा आहेत, अशी विचित्र कल्पना आपण करत होतो; परंतु एखादी लोकशाही आणि निर्घृण हुकूमशाही यांच्या दरम्यान नेतृत्वाच्या अनेक छटा आहेत. खंबीर मातृहृदयी नेतृत्व ही त्यातली एक कल्याणकारी छटा आहे. रंगीत दूरदर्शनच्या द्वारे राजकीय शिक्षणाचे हे महान् कार्य होईल अशी अपेक्षा बाळगणाऱ्यांपैकी मी आहे,' असे विचारपरिप्लुत उद्गार त्यांनी काढले आहेत.

आमचा धोबी नामा तराटे हा मात्र नाखूष आहे. 'तसा माझा रंगीत टी. व्ही. ला विरोध नाही; पण आमच्या धंद्यातली माणसं महा इब्लिस आहेत. आता धोबी-घाटावर समजा आमचा छगन्या–लई डॅंबिस बेणं हाय त–प्यांटा धुतंय् अन् गेला रंगीत टी. व्ही. वाला त्याच्या मुलाखतीला. विचारतोय् 'काय इवलताय छगनराव.' आमचा छगन्या म्हणेल. 'अवं टी. व्ही. वाले लई आबदा असत्ये आमच्या धंद्यात. ही तुमच्या मिनिस्टर सायबाची पॅंट. आऽराऽराऽराऽ घेराव झाला व्हता म्हनत्यात काल ! अन् ही ऽ उघडून दावील प्यांट. सांगा, असला माणस असल्यावर बलावतील का कधी आम्हाला रंगीत टी. व्ही. वर ? काय उपेग नाही त्येचा आमाला !'

□

# पुस्तके

मुकुंद टाकसाळे

# ' पु. ल. : एक साठवण '

## एक ' प्रसन्न ' पुस्तक

पुस्तके विकत घेऊन वाचायची आवड असणाऱ्या मराठी माणसांजवळ पु. लं. ची कुठली ना कुठली तरी पुस्तके संग्रही असतातच. आपल्याकडला बहुसंख्य वाचकवर्ग (अजून तरी) मध्यमवर्गीयच आहे हे ध्यानात घेता ते स्वाभाविकच आहे. मध्यमवर्गीय मनाला आवडणारे, रुचणारे, पटणारे बरेच काही पु. लं. च्या साहित्यात आहे आणि म्हणून ' पु. लं. : एक साठवण ' ह्या पुस्तकाची पहिली आवृत्ती आगाऊ नोंदणीतच संपून गेली.

पु. लं. ची महत्त्वाची पुस्तके संग्रही असणारा वाचक-मंडळी मनाशी कदाचित असा विचार करतील की, आपल्याकडे वटाटयाची चाळ, व्यक्ती आणि वल्ली, तुझे आहे तुजपाशी, असा मी, असा मी, गणगोत, अपूर्वाई, पूर्वरंग वगैरे पुस्तके आहेतच; तर मग हे ' पु. ल : एक साठवण ' हे पुस्तक कशासाठी खरेदी करायचे ? ' पु. लं. च्या साहित्यातील निवडक ' अशी पुस्तकांची जाहिरात असल्याने हा प्रश्न मनात उभा राहणे स्वाभाविक आहे; परंतु ' साठवण 'मधील निम्मे साहित्य पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेले नाही हे अशा वाचकांनी लक्षात घ्यावे.

' साठवण 'मध्ये नारायण, अन्तूबर्वा, नंदा प्रधान, सखाराम गटणे ह्या व्यक्ती आणि वल्ली आहेत. ' गणगोत 'मधील रावसाहेब आणि ऋग्वेदी आहेत. ' असा मी असा मी '-मधील नानू सरंजामेचे आरस्पानी दर्शन घडवणारे आत्मचरित्र आहे आणि गुरुदेवांकडले गुबगुबीत अध्यात्म आहे, ' तुझे आहे तुजपाशी 'चा तिसरा अंक आहे, सदू आणि दादू ही एकांकिका आहे, ' अपूर्वाई 'मधला बॉबी आहे, फ्रेंच लोकांची स्वभाववैशिष्टये आहेत. ' पूर्वरंग 'मधील बालीवाले बेट आणि त्यातले केचक् नृत्य आहे, जपानमधील झगमगणारी अतामीआहे,'बटाटयाचा चाळी'तली ' संगीतिका ' आणि ' चिंतन ' आहे; ' हसवणूक 'मधील काही अप-काही डाऊन ' हा रेल्वेच्या दुनियेचा अफलातून लेख आहे, ' नस्ती उठाठेव 'मधील 'अंगुस्तान विद्यापीठ' ' खोगीर भरती 'तला ' पानवाला ' आहे, ' वंगचित्रे ' आहेत...हे सारे आपल्या परिचयाचे आहे, आपल्याकडे ही पुस्तके संग्रही असण्याचीही शक्यता आहे, ज्यांच्याजवळ मूळ पुस्तके नसतील त्यांना पुन:प्रत्ययाचा आनंद ' साठवण 'मधील वरील मजकूर वाचून मिळेल.

पण ह्याखेरीज पु. लं. च्या कुठल्याही पुस्तकात नसणारी ' वुडहाउस ' आणि ' खानोलकर ' ह्यांची व्यक्तिचित्रणे ह्या पुस्तकात आहेत. बालपणीच्या आठवणी सांगणारा पु लं. चा ' बालपणीचा काळ सुखाचा ' हा लेख आहे. एके काळी खूप गाजलेला ' वीणा ' दिवाळी अंकातील 'खुर्च्या ( भाडयाने आणलेल्या ) हा नवनाटयाचे विडंबन करणारा लेख आहे. पु. लं. चे सूक्ष्म निरीक्षण (की श्रवण ?) दाखवणारा 'आवाज...आवाज' हा दूधवाल्या भैय्याच्या ' बाई दोध ' पासून ते मध्यरात्री मनाला अस्वस्थ करणाऱ्या घडाळयांच्या ' टिक् टिक् टिक् टिक् ' ह्या आवाजापर्यंत साऱ्या आवाजांची दुनिया आपल्यासमोर उभा करणारा लेख ' साठवण 'मध्ये आहे. शिक्षकांचा मोर्चा पाहून अस्वस्थ झालेल्या पु. लं. चा एक अस्वस्थ करणारा छोटासा लेख पुस्तकात आहे. संपादकांच्या आपआपसातल्या लाथाळ्या आजही चालू असतात. या विषयावरची एक छोटी रूपककथा-' गाढवाची गोष्ट ' ' साठवण 'मध्ये आहे. खेरीज पु. लं. च्या विनोदी कवितांचाही समावेश ' साठवण 'मध्ये आवर्जून केलेला आहे.-

मी एकदा आळीत गेलो  
चाळ घेऊन बाहेर आलो  
तोंडात भरली सगळी चाळ  
भीतर मुलखाचा वाचाळ  
चाळीबाहेर दुकान माझे  
विकतो तेथे हसणे ताजे  
' खुदकन् हसू 'चे पैसे आठ  
' खो खो खो 'चे एकशेसाठ  
हसवण्याचा करतो धंदा  
कुणी निंदा-कुणी वंदा  
कुणाकुणाला पडतो पेच  
ह्याला का नाही लागत ठेच ?  
हा लेकाचा शहाणा की खुळा ?  
मग मी मारतो मलाच डोळा

आणखी एक : पु. लं. चा ७६ च्या ' मौज ' दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेला एक गंभीर लेख ' साठवण 'मध्ये आहे. कलावंताला न टाळता येणारे जे अंतिम एकटेपण आहे त्या त्याविषयीचा, शेक्सपियरच्या निमित्ताने लिहिलेला.

साहित्याची निवड करणे हे अत्यंत अवघड काम होते. संपादक जयवंत दळवी ह्यांनी त्यासाठी बरेच कष्ट घेतलेले आहेत. आपल्या अनेक मित्रांशी पत्रव्यवहार करून त्यांनी

त्यांची मते मागवून घेतलेली आहेत; पण तरीही ह्या निवडीबाबत मतभेद होणारच यात शंका नाही. 'नस्ती उठाठेव 'मधला 'अंगुस्तान विद्यापीठ' हा लेख आजच्या काळात खूपच कंटाळवाणा वाटतो. हा लेख समाविष्ट करण्यामागे पु. लं. च्या विनोदाचे सुरुवातीचे स्वरूप कसे होते ते दाखवणे हा हेतू असावा का ? -बहुधा नसावा. कारण अशा प्रकारचा अभ्यास वाचकांना घडावा अशी संपादकांची मुळीच इच्छा नाही. प्रस्तावनेत सुरुवातीलाच त्यांनी तसे स्पष्ट म्हटलेले आहे. पु. लं. च्या कवितांचा आठवणीने समावेश करण्याचा जागरूकपणा दाखवणाऱ्या संपादकांच्या हातून कथाकार पु. लं. हे साफ निसटले आहेत. 'गोळाबेरीज 'मधील कुठल्याच लेखाचा समावेश 'साठवण 'मध्ये नाही. वास्तविक 'म्हैस' ही त्या पुस्तकातली विनोदी कथा किती सुंदर आहे ! पण ही कथा संपादकांच्या नजरेतून निसटलेली आहे.

'बटाटयाच्या चाळी 'तले निवडलेले 'चिंतन' हे खरोखरच आवश्यक होते का ? दळवींनी ज्या कुणा साठ-सत्तर मित्रांची मते मागवलेली होती त्यातील म्हणे प्रत्येकाने 'चिंतना 'ची शिफारस केलेली होती. अगदी अलीकडल्या पिढीतील कुणी ह्या साठ-सत्तर जणांमध्ये नसावे असे मला वाटते. कारण अलीकडच्या पिढीला 'चिंतन 'मधलाच काय; पण एकूणच पु. लं. च्या लेखनातला nostalgia ( जुन्याबद्दलचे हळवेपण ) खोटा, वाटतो तापदायक वाटतो. पु. लं. च्या निखळ विनोदाचा नमुना असणारी 'भ्रमण मंडळ 'सारखी विनोदी कथा ह्या 'चिंतना 'ऐवजी 'साठवण 'मध्ये असती तर अधिक बरे झाले असते असे मला वाटते.

पण हाच nostalgia हा पु. लं. च्या ललित किंवा विनोदी लेखनात हा nostalgia पद्धतशीरपणे जोपासलेला आहे. सामाजिक जाणिवांबद्दल किंवा दलित लेखनाबद्दल पु. ल. स्वतंत्र लेखात जे म्हणतात ते 'त्यांच्या' अशा म्हणवल्या जाणाऱ्या ललित लेखनात कुठेच आढळत नाही. नवीन नाटकांचे स्वागत करणारा स्वतंत्र लेख पु. ल. लिहितील; पण 'खुर्च्या 'ची ते टिंगलच करणार. दुर्दैवाने जुन्याबद्दल प्रेम जोपासणारे पु. ल. हेच अधिकाधिक डोळ्यांसमोर येतात किंवा आणले जातात. त्यांचा 'एक शून्य मी 'सारखा लेख 'साठवण 'मध्ये येत नाही. पु. लं. नी लिहिलेल्या साऱ्या प्रस्तावना उत्कृष्ट आहेत असे नव्हे; पण 'अस्मिता महाराष्ट्राची ' सारख्या ग्रंथाला लिहिलेली खणखणीतपणे विज्ञाननिष्ठेचा पुरस्कार करणारी प्रस्तावना-('प्रस्तावना' कसली एक छोटासा स्वतंत्र लेखच तो) 'साठवण 'मध्ये असायला हवी होती. 'चाळी 'तली संगीतिका ही ज्यांनी तो पु. लं. चा एकपात्री प्रयोग पाहिलेला आहे त्यांना अधिक आवडते. इतरांना नुसते वाचून त्या 'संगीतिके 'तला आनंद लुटता येतोच असे नाही. त्याऐवजी 'मौजे 'च्या कुठल्याशा दिवाळी अंकातला (आणि कोणत्याही पुस्तकात प्रसिद्ध न झालेला) 'मराठी साहित्याचा गाळीव इतिहास' (शीर्षकातील चूकभूल द्यावी घ्यावी) हा लेख फारच धमाल होता.

'साठवण 'मध्ये काय असायला हवे होते आणि काय नसायला हवे होते ह्याबद्दल प्रत्येकाची मते वेगवेगळी असणार. ही मतभिन्नता मान्य करूनच 'साठवण 'कडे पाहायला हवे. तरीही पु. लं. च्या चाहत्यांमध्ये पु. लं. ची जी प्रतिमा लोकप्रिय आहे ती अधिक ठसविण्यासाठी 'साठवण 'मध्ये भरपूर साहित्य आहे. अगदी 'अपूर्वाई 'तला 'अज्ञात आत्माराम' सुद्धा आहे आणि पु. ल.' म्हटल्यानंतर हे सारे असणारच हे गृहीत धरायला हवे.

पु. ल. ह्या व्यक्तीत अनेक गुण सामावलेले आहेत. दळवींनी त्यांची जी भाषणे आणि पत्रे आपल्यासमोर निवडून ठेवलेली आहेत, त्यामुळे आपल्यापुढे पु. लं. चे संपूर्ण व्यक्तिमत्त्व उभे राहते. 'अपूर्वाई 'च्या प्रस्तावनेत (जी 'साठवण 'मध्ये आहे) पु. लं. नी म्हटलेले आहे-'प्रवासवर्णन आणि आत्मचरित्र लिहायचे नाही हे दोन्ही संकल्प त्या एकाच पुस्तकात मोडलेले आहेत. कारण पुढल्या दोन-अडीचशे पानात मी केलेल्या प्रवासाचे वर्णन नसून प्रवासात असलेल्या माझेच वर्णन अधिक आहे.' खरं तर पु. लं. च्या 'साठवण 'मधील कुठल्याही लेखनातून त्यांचे व्यक्तिमत्त्व उभे राहते; पण तरीही भाषणांमुळे आणि पत्रांमुळे त्याला पूर्णत्व येते. 'साठवण 'मधील भाषणे आणि पत्रांचा विभाग 'आपुलकी' हा त्या दृष्टीने बघण्यासारखा आहे.

'असा मी 'तल्या मध्यमवर्गीय मूल्यांना कवटाळून राहणाऱ्या 'मी 'चे चित्र रंगवणारे पु. ल. आणीबाणीत 'विचाराची नस तोडू नका' अशी गर्जना करताना आपल्याला दिसतात. 'जो जे वांछील तो ते लिहो' असे लेखनस्वातंत्र्याचे उदात्त पसायदान त्यांनी इचलकरंजी येथील सुवर्णमहोत्सवी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात मागितलेले आहे. हेमलकशाला बाबा आमटयांबरोबर गेलेले पु. ल. तिथल्या आदिवासींची परिस्थिती पाहून व्यथित होतात. त्यांच्याविषयी अस्सल कळवळयाने बोलतात. साहित्यावर अजून मला खूप खूप प्रेम करायचे आहे. I cannot love it enough असे ते साहित्य अकादमीचे पारितोषिक स्वीकारताना म्हणतात. जाता जाता पु. ल. मराठीप्रमाणे इंग्रजीतही उत्तम विनोद करू शकतात. उदाहरणार्थ-'My publisher wants me to write, perhaps because my books sell. That is why my critics call me a popular writer, and dismiss me forthwith. I don't blame them. I merely dismiss them by calling them critics.'

'आपुलकी 'मधील सारीच पत्रे मुळातून वाचण्यासारखी आहेत. गणेशशास्त्री जोशींनी अमेरिकेचे वर्णन करणारे पत्र त्यांना संस्कृतमध्ये पाठवले होते. त्याला त्यांनी संस्कृतमध्येच उत्तर दिलेले आहे. पु. लं. च्या संस्कृताबद्दल कौतुक वाटते न वाटते तोच एखादे पत्र बंगाली भाषेत लिहिलेले आढळते. वयाच्या पन्नाशीनंतर पु. ल. बंगाली शिकलेले आहेत हे लक्षात येऊन तर त्याचे विशेषच कौतुक वाटते. एखादे पत्र कोकणीत तर एखादे पत्र (घटप्रभेहून पाठवलेले) कानडी ढंगाच्या मराठीत. पु. लं. चा व्रात्यपणा दाखवणारी दोन गंमतीशीर पत्रे 'आपुलकी 'त आहेत. एक म्हणजे लालजी देसाईंना पाठवलेले सचित्र पत्र. त्यातले व्यंगचित्र आणि कविता पाहून पु. लं. च्या व्यक्तिमत्त्वात, दळवींनी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे, व्रात्य पोर दडलेले आहे, याची साक्ष पटते. दुसरे व्रात्य पत्र मंगेश राजाध्यक्षांच्या मुलीला-मुक्ताला 'इंग्रजी 'त लिहिलेले आहे, इंग्रजी कसले- तर हे असले- 'Fuss class in M. A. is no joke yaar... So, fuss con-

gratulations from the bottom of my heart– Many people must have congratulated you from their bottoms also.' केवळ गंमत म्हणून पु. ल. असा पोरकटपणा करतात हे पाहून गंमत वाटते. पु. लं. च्या स्वभावातला चावटपणा पाहायचा असेल तर शरच्चंद्र बडोदेकरांना त्यांनी लिहिलेली एक 'हायकू' (जपानी काव्यप्रकार, इथे त्याचे विडंबन) वाचा. संदर्भ असा की, इंचलकरंजीला एका 'गायकू'ची ठुमरी आठवून पु. लं. ना ही एक हायकू सुचली–

**गवयीबुवांची ठुमरी ऐकून**
**सुननेवाले ओरडले**
**'ऐसी ना मारो–'**

पुढे पु. ल. पत्रात लिहितात– 'ही हायकू वाचून होळी जवळ आल्यासारखे वाटले असणारच. निसर्गाशी हे असे तादात्म्य पाळावे लागते, तरच कवी होता येते म्हणतात.'

पु. लं. चा हा असला दिलखुलास विनोद एरवी कुठे आढळणार? 'कंडक्टेड टूर'-बरोबर काश्मीरची सहल करून आलेल्या पु. लं. नी धारच्या शिल्पकार फडक्यांना पाठवलेले पत्रही असेच मजेशीर आहे.

पु. लं. च्या पत्रांतली काही पत्रे दलित साहित्याच्या संदर्भातली त्यांची भूमिका स्पष्ट करणारी आहेत; पण त्याहीपेक्षा त्यांच्या स्वतःच्या आजवरच्या लेखनामागची भूमिका स्पष्ट करणारी आहेत. दलितांबद्दलचा कळवळा अस्सल असूनही पु. लं. चे लेखन 'मध्यमवर्गीय' का वाटते? प्र. श्री. नेरूरकरांना लिहिलेल्या पत्रात पु. ल. म्हणतात– '...मध्यमवर्गीय परिस्थिती आणि संस्कारात वाढलेल्या माझ्यासारख्या माणसाच्या कार्यशक्तीला अपरिहार्यपणाने बंधने पडतात. नारायण सुर्वे, बागूल, दया पवार, नामदेव ढसाळ यांच्यासारख्या, ज्यांनी पददलितांचे भोग भोगलेले आहेत, अशा माझ्या अत्यंत आवडत्या लेखकांच्या कृती वाचताना माझ्यामधल्या ह्या उणीवा मला तीव्रतेने जाणवत असतात; पण मी 'टूम' म्हणून लेखनासाठी विषय किंवा विषयांची मांडणी स्वीकारली नाही. ह्यातून जे लिहिले गेले ते माझा पिंड ज्या संस्कारांनी घडला आहे, त्याचे सारे गुणदोष घेऊनच प्रकटले.'

गंगाधर पानतवण्यांना लिहिलेल्या एका पत्रात पु. ल. म्हणतात– '...मुंबईत भरलेल्या बंगीय साहित्यसंमेलनाचा उद्घाटक म्हणून भाषण करताना मी 'मराठीतले आजचे साहित्य म्हणजे दलित साहित्य' असे म्हणून 'आपल्या देशातील उद्याचा शरदबाबू आमच्या दलित साहित्यिकातून येणार आहे.' असा विश्वास प्रकट केला होता... एक गोष्ट खरी की मी पोथीनिष्ठ मार्क्सवादीही नाही की गांधीवादीही नाही.'

## दोन भूमिका

पु. लं. ची ही भूमिका माझ्यासारख्या सर्वसामान्य वाचकांना गोंधळात टाकणारी वाटते. पु. लं. नी 'हरितात्या'मध्ये लिहिलेला हा मजकूर पाहा– '...आजोबा आणि हरितात्या यांच्याबरोबर आमचा खरा गणपती गेला. आता गणेशचतुर्थीला घरातली आधुनिक मंडळी उगीचच हिंदुपणाचा आळ येईल ह्या भीतीने 'मुलांची हौस असते' वगैरे कारणं सांगत गणपती आणतात आणि मांडतात. त्याला खणखणत्या आरत्यांनी कोणी जागवत नाही. खिरापत चमच्यांनी वाटतात.' असल्या प्रकारची खंत वाटणे आणि 'एक गाव एक पाणवठा' आवडणे ह्या दोन गोष्टी एकत्र कशा नांदू शकतात? ह्या दोन भूमिकांमधली विसंगती सामान्य वाचकांना निश्चितच गोंधळात टाकणारी आहे. वाईट हे आहे की पु. ल. जिथे जबरदस्त आवडले जातात, जिथे त्यांच्या पुस्तकांची पारायणे केली जातात– अशा मध्यमवर्गीय घरात हे 'आरत्यांबद्दलची खंत' वाटणारेच लिखाण मोठ्या प्रमाणात वाचले जाते. दलितांबद्दल ते काय म्हणतात ह्याची फारशी दखलही घेतली जात नाही.

व्यक्ती आणि लेखक म्हणून पु. लं. चे एका शब्दात वर्णन करायचे झाल्यास 'प्रसन्न' ह्या शब्दाने ते करता येईल. पु. लं. चे लेखन आणि व्यक्तिमत्त्व ह्या दोहोंतही 'प्रसन्नता' हा एकमेव गुण आहेच आहे. पु. लं. च्या लेखनात कुरूपता फारशी आढळतच नाही. 'गणगोत'मधील लेखनविषय झालेल्या काही व्यक्तींबद्दल बाहेर तितकेसे बरे बोलले जात नाही; पण पु. लं. च्या 'गणगोता'त ह्या व्यक्ती कशा छान, देखण्या होऊन येतात. 'मला ती माणसं जशी दिसली, तशी ती रंगवली. इतरांना ती कदाचित् तशी वाटणारही नाहीत' असे म्हणून पु. ल. स्वतःची सहजी सुटका करून घेऊ शकतात का? 'गणगोता'बाबत कदाचित् ते खरेही असेल; पण काल्पनिक लेखनाबाबत काय? पु. ल. चित्रपट–नाटच वगैरे अनेक क्षेत्रात वावरले आहेत. बाबा आमटेंना लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात– 'भावी शेठजीसाठी शेजेचा माल तयार करणाऱ्या आया आणि पोरींना सिनेमात चान्स मिळवून घरात लाखांची आयात करू पाहाणारे बाप पोटच्या पोरीच्या 'फिगर'ची तारीफ करीत स्टुडिओतून हिंडताना मीही पाहिलेले आहेत. मग असा एखादा बाप किंवा आई पु. लं. च्या लेखनात कधीच कुठे कशी डोकावत नाही? मुंबईच्याच चाळीत गंगाधर गाडगिळांना 'किडलेली माणसे' दिसली. पु. लं. च्या चाळीत तसली माणसे नाहीतच. लुटुपुटीची भांडणे करून परत एकमेकाला धरून राहणारी 'बटाट्याची चाळी'तली माणसे. 'पण अजून धागे तुटले नाहीत. अजूनही चाळीत लग्न–मुंज झाली तर माणसे अंग मोडून राबतात. कार्य घरचे आहे, म्हणतात. कुठे तरी एकाच नळाच्या पाण्यातून प्रेम आले ते टिकले आहे...' हे 'चिंतन' वाचल्यानंतर आपण पाहिलेल्या खऱ्याखुऱ्या चाळीतली किडकी माणसे दृष्टीसमोर येतात आणि 'चाळी'चे खोटेपण अधिक जाणवते.

जीवनातली कुरूपता, हिडिसपणा हा मध्यमवर्गीय वाचकाला साहित्यातून दिसायला नको असतो. (भले त्यांच्या प्रत्यक्ष जीवनात तो किती का असेना.) पु. लं. नी आपल्या साहित्यात ही कुरूपता टाळलेली आहे, हिडिसपणा टाळलेला आहे. त्यांचे सारे साहित्य 'प्रसन्नता' ह्या गुणाने भरलेले आहे आणि म्हणूनच मध्यमवर्गीय वाचकात पु. ल. लोकप्रिय आहेत.

पु. लं. च्या साठीनिमित्त हे पुस्तक प्रकाशित होत असल्याने त्यांच्या साहित्यातील गुण–दोषांची चर्चा संपादक जयवंत दळवींनी टाळलेली असावी. त्यांनी लिहिलेली प्रस्तावना साठी–सोहळ्याला साजेशीच आहे. त्यांनी पु. लं. चे व्यक्ती म्हणून दाखवलेले दोषही (भांडणाची खुमखुमी वगैरे) अगदी वरवरचे–पु. लं. नाही काहीसे गुदगुल्या करतील असेच–आहेत; परंतु पु. लं. च्या

बहुरंगी, बहुढंगी, हरहुन्नरी व्यक्तिमत्त्वाचा परिचय त्यांनी छान करून दिलेला आहे.

साठी–सोहळ्यानिमित्त हे पुस्तक प्रकाशित करण्यात 'मॅजेस्टिक'च्या कोठावळ्यांनी, संपादक जयवंत दळवींनी मोठे औचित्य साधले आहे ह्यात शंकाच नाही.

परंतु ह्या पुस्तकाच्या प्रसन्नतेत, देखणेपणात वसंत सरवटेंनी खूपच भर टाकलेली आहे. जवळजवळ पानोपानी त्यांनी चित्रे टाकलेली आहेत. मुखपृष्ठापासून ते शेवटच्या पानापर्यंत माणूस पुस्तक 'पाहात' जातो आणि ही एवढी सजावट त्यांनी विनामूल्य केलेली आहे–पु. लं.च्या प्रेमाखातर. (दळवींनीही आपल्या कामाचा मोबदला घेतलेला नाही.) सरवटेंचांची काही चित्रे केवळ सुरेख आहेत. पु. लं. च्या व्यंगचित्रांची अनेक पोस्टाची तिकिटे त्यांनी मुखपृष्ठावर लावलेली आहेत. अनेक मुखवटे खांद्यावर टाकलेले, तंबोरा, पेटी ह्यांच्याशी साधर्म्य साधणारे, पंख लावून आकाशातून देशोदेशी संचार करणारे, अनेकांना हसवणारे... अशी पु. लं. ची अनेक तिकिटे मुखपृष्ठावर आहेत. पहिले पान उघडल्या उघडल्या चाळीकडे काहीसे दुरून आणि अंतर्मुख होऊन पाहणारे पाठमोरे पु. ल. दिसतात. पु. लं. च्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवणारे एक पानभर चित्र प्रत्येक विभागाच्या अगोदर टाकलेले आहे. हे अभ्यासिकेचे चित्र आहे. पुस्तकेच पुस्तके, त्यात रवींद्रनाथ, शेक्सपियर, चॅर्ली चॅप्लिन, जुन्या काळातले टेबल–खुर्ची, टेबलावरील लेटरबॉक्समध्ये असंख्य पत्रे–बाजूला दौत-टाक, भिंतीवर दशावतारी खेळातला गणपतीचा मुखवटा, स्टुलावर जुन्या काळातला फोनो, हार्मोनियम, तबला, तंबोरा, हुक्का, बाजूला गालीचा अंथरलेला, फुलदाणीत फुले, त्याखाली एक जुना कंदील, तांब्याभांडे आणि छत्री... ही सारी यादी सविस्तर देण्यामागे उद्देश एवढाच आहे की 'पु. ल. म्हणजे काय' ह्या प्रश्नाचे उत्तर एवढ्या एका पानामध्ये सरवटेचांनी दिलेले आहे. 'आवाज आवाज' लेखातली छोटीछोटी चित्रे, 'असा मी'मधील 'ब्रदर सुकुमारसेन बंडोपाध्याय सिंगिंग ए बेंगॉली प्रेयर', 'काही अप्–काही डाउन' मधील चिमुकला फलाट, फलाटावरची वेटिंग रूम आणि शेवटचे गाडी दूर गेल्याचे चित्र... किती चित्रांचा उल्लेख करावा? पान न् पान देखणे करायचे ह्या व्रीदानेच हा चित्रकार हाती कुंचला घेऊन बसलेला आहे की काय असे वाटते.

पु. लं. चे साहित्य, वसंत सरवटेचांची सजावट, 'मौजे'ची छपाई... आणि पाचशे पानांच्या ह्या पुस्तकाची किंमत फक्त पंचवीस रुपये. (दुसऱ्या आवृत्तीला ही किंमत तीस रुपये केलेली आहे.) असा योग एकूण दुर्मिळच! पु. ल. प्रकाशन समारंभात म्हणाले होते–'माझं एवढं चांगलं पुस्तक निघायला वयाचं साठावं वर्ष लागायला लागावं याच्याबद्दल मलाच वाईट वाटतं... वाचा किंवा न वाचा, एक सुंदर पुस्तक म्हणून पाहा.' □

## अस्वस्थ आसाम : पृष्ठ ८ वरून

पक्षाचे विद्यमान अध्यक्ष श्री. गौरीशंकर भट्टाचार्य मला म्हणाले, चिनी फौजांच्या तावडीत आम्ही सापडलो होतो, एकीकडे पारतंत्र्याची भीती मनात घर करून होती, तर दुसरीकडे आमचे देशबांधव या संकटातून आम्हाला सोडवतील असा दृढ आशावाद होता. उर्वरित भारताकडून, आमच्या नेत्यांकडून या वेळी खरं म्हणजे आश्वासक शब्दांची आणि धीराची आमची अपेक्षा होती. त्याऐवजी आम्हाला मिळालं काय? 'माझ्या शुभेच्छा आसामच्या जनतेबरोबर आहेत' हे आणि एवढेच शब्द आणि तेही पंतप्रधान नेहरूंकडून! एका हताश आणि हतबल पंतप्रधानाचे हे शब्द जेव्हा जेव्हा आठवतात तेव्हा तेव्हा माझं मन आक्रंदून उठतं.'

भट्टाचार्यांनी जे सांगितलं ते खरंच हादरून टाकणारं होतं. आमच्या राष्ट्रीय नेत्यांनी आसामवर आतापर्यंत केलेले अन्याय जणू कमीच होते म्हणून आसामच्या जनतेवर हा आणखी एक घोर अन्याय होऊ पहात होता.

दरम्यान बंगाली घुसखोरांची संख्या दिवसेंदिवस वाढतच होती. फाळणीनंतर नेहरू–लियाकत अली करारान्वये आलेले सुमारे ५ लाख नागरिक वगळले तरी १९५१–६१ या दहा वर्षांत १३,६३,५४३ परकीय भारतात आले असे जनगणन अहवालात म्हटले आहे. यापैकी एकट्या पूर्वपाकिस्तानातून आलेल्यांची संख्या सुमारे आठ लाख असल्याचेही याच अहवालात म्हटले आहे. या अहवालात पुढे हेही नमूद करण्यात आलं आहे की, १९५१–६१ या काळात सबंध भारतात लोकसंख्यावाढीचे सरासरी प्रमाण २१·६४% होते तर आसामात मात्र वाढीचे प्रमाण ३४·९८% एवढे होते. यानंतर दहा वर्षांनी, म्हणजे १९७१ मध्ये झालेल्या जनगणनेतही लोकसंख्यावाढीच्या प्रमाणातील हे अंतर कायम राहिल्याचे दिसून येते. या वेळी भारतातील लोकसंख्यावाढीचे सरासरी प्रमाण २४·८% होते, तर आसामात ते ३४·९५% एवढे होते.

१९६५ आणि १९७१ च्या युद्धांमुळे घुसखोरांचे प्रमाण वाढते राहण्यास मदतच झाली. बांगलादेशच्या युद्धाच्या वेळी लाखो निर्वासित भारतात आले, त्यातले बरेचसे परत मायदेशी गेले हे खरे असले तरी मायदेशी न जाता भारतातच तळ ठोकणाऱ्यांची संख्या कमी नव्हती. अखिल आसाम विद्यार्थी संघटनेनं जनगणना–अहवालाचा हवाला देऊन एका पुस्तिकेत केलेल्या दाव्यानुसार १९७१ या अवघ्या एका वर्षात आसामच्या लोकसंख्येत सुमारे २६ लाख निर्वासितांची भर पडली व त्यातील एकतृतियांशापेक्षाही जास्त निर्वासित अद्यापही आसामातच आहेत. निवडणूक आयोगानं प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसारही ही बाब सिद्ध होणारी आहे. १९७१ साली निवडणुकीसाठी अद्यावत करण्यात आलेल्या मतदारयादीत १९७० पेक्षा मतदारांची संख्या, एका वर्षात, सहा लाखांनी वाढल्याचे या अहवालात म्हटले आहे. अशीच मतदारांच्या संख्येतील अनैसर्गिक वाढ १९७७–७८ या दोन वर्षांतही दिसून येते. १९७७ पेक्षा १९७८ मधील मतदारांची संख्या ७ लाखांहून अधिक आहे.

खरं म्हणजे आसामातील घुसखोरांच्या या वाढत्या संख्येबद्दल जेवढी आकडेवारी द्यावी तेवढी कमीच ठरेल.

आसामात अवैधपणे घुसणाऱ्या पूर्वबंगाल्यांची समस्या दीडशे वर्षांची जुनी समस्या असली तरी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात होणाऱ्या घुसखोरीची कारणे आणि स्वरूप मात्र वेगवेगळे आहे. पूर्व-पाकिस्तानचा बांगलादेश झाला तरी तेथील राजकीय अस्थिरता काही संपली नाही. या अस्थिरतेचा सामान्य जनजीवनावर विपरीत परिणाम झाला व त्यामुळे मायदेशाला रामराम ठोकून अनेक पूर्व-बंगाली आसामात स्थायिक झाले. पूर्वपाकिस्तान हे तर इस्लामी राष्ट्र होतेच; पण बांगला देशातही आज धर्मनिरपेक्षतेचे वातावरण असे दिसून येत नाही. त्यामुळे अनेक हिंदू बंगाल्यांनी आसामात पळ काढला. 'याबरोबरच बांगला देशातील बिकट आर्थिक स्थिती व सततची भाववाढ यांना कंटाळून अनेक जण आसामात आले.' ही माहितीही राज्य जनताध्यक्ष गौरीशंकर भट्टाचार्य यांनीच सांगितली. जाता जाता श्री. गौरीशंकर भट्टाचार्यांबद्दलही थोडंसं सांगितलं पाहिजे. श्री. भट्टाचार्य हे १९६२ पर्यंत कम्युनिस्ट पक्षात होते. पुढे चीनच्या युद्धाबाबत पक्षनेत्यांची भूमिका पसंत न पडल्याने त्यांनी स्वतःचाच एक पक्ष स्थापन केला व काही काळ तो चालविलाही. त्यानंतर ते जनता पक्षात आले व आज जनता पक्षाचे निर्वाचित अध्यक्ष आहेत. श्री: भट्टाचार्य अर्थशास्त्र आणि कायद्याचे पदवीधर आहेत आणि साध्या संभाषणातूनही त्यांची विद्वत्ता डोकावत असते. 'मी मूळचा बंगाली असलो तरी आसामच्या जीवनाशी मी समरस झालो आहे. मी आज एक असमियाच बनलो आहे' ही बाब श्री. भट्टाचार्य आवर्जून सांगतात.

बांगला देशातून निर्वासित आणि घुसखोर कशा प्रकारे येत राहिले याची सविस्तर माहिती सांगताना श्री. भट्टाचार्य म्हणाले की, बांगला देशातील जीवनावश्यक वस्तूंचे भडकते भाव हे या सततच्या समस्येमागील महत्त्वाचे कारण आहे. भारताच्या तुलनेत सर्व वस्तूंचे भाव या देशात तिपटीने अधिक आहेत. आजही बांगला देशात साखरेचा भाव १८ रु. किलो आहे तर तांदुळाचा ७ रु. किलो.

भारतात वैध-अवैध मार्गांनी येणारा एक घुसखोर आपल्या पाच बंगाली बांधवांनाही आसामात कशा प्रकारे आणीत असे याचीही माहिती श्री. भट्टाचार्य यांनी दिली. निवडणुकीच्या वेळी मतदारांच्या सुधारित याद्या बनविण्याचे काम सुरू होत असे तेव्हा भारतात आलेला कुणी एखादा 'खान', 'अली' किंवा 'चक्रवर्ती' आपल्याबरोबर न आलेल्या, बांगला देशातच असलेल्या आणखी चार बंगाल्यांची नावेही यादीत नोंदवून घेत असे. याद्या तपासताना ही मंडळी खरेच अस्तित्वात आहेत की नाही हे फारसे काळजीपूर्वक तपासले जात नसे, जात नाही. अशा स्थितीत भारतात मतदारयादीत नाव गेल्याने एकाच वेळी दोन्ही देशात 'अधिकृत नागरिक' बनलेले बंगाली बांगला देशातून भारतात येत आणि अगदी हक्कानं भारतात स्थायिक होत. जमिनीचा छोटा-मोठा तुकडा विकत घेतला किंवा घर विकत घेतले म्हणजे नागरिकत्वावर अधिकृत शिक्कामोर्तबही आपोआपच होई.

या घुसखोरांपैकी मुस्लीम प्रामुख्याने ग्रामीण भागात स्थायिक झाले तर हिंदू शहरात आले. इतक्या मोठ्या संख्येने आणि अगदी सहजगत्या घुसखोर येऊ शकले याचे एक प्रमुख कारण म्हणजे बांगला देश आणि भारताच्या सीमेवर असलेला तुटपुंजा पहारा! मुळात या दोन देशांमध्ये सीमा अशी काही अस्तित्वातच नाही. शंभरएक यार्डांवर खांब उभे केले आहेत; परंतु अन्य कोणतीही कुंपणवजा व्यवस्था दिसत नाही. सीमा सुरक्षा दलाच्या चौक्यांची संख्याही खूपच कमी आहे. त्यामुळे या चौक्यांना चुकवून येणे घुसखोरांना कठीण नाही. परिणामतः धुब्री, गोलपारा आणि करीमगंज भागात काही गावांत तर अनेक बांगलादेशी दिवसा भारतात प्रवेशतात, रिक्षा चालवून कमाई करतात आणि झोपायला पुन्हा बांगला देशात जातात. बेकारीची आंतरराष्ट्रीय समस्या सोडविण्यासाठी 'दोन देशांनी केलेल्या सहकार्याचे' इतके चांगले उदाहरण अन्यत्र आढळणार नाही. जिथे सीमा सुरक्षा दलाचे पहारे आहेत तिथूनही भारतात येणे बांगलादेशीयांना कठीण नाही. 'सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांना आणि जवानांना पैसे चारले की अस्सल रेशनकार्डासह बांगला देशीय भारतात येऊ शकतात' असेही श्री. भट्टाचार्य यांनी सांगितले.

आसामातील घुसखोरांबद्दल ही थक्क करणारी माहिती ऐकल्यावर स्वाभाविकच एक प्रश्न मनात येतो तो म्हणजे ही सारी परिस्थिती असमियांना ठाऊक होती. मग आंदोलन करायला १९७९ चा मुहूर्तच का निवडला गेला? इतकी वर्षे ही मंडळी काय करीत होती? आसामातील विविध क्षेत्रांतील डझन-दीड डझन नामवंत व्यक्तींना मी भेटलो; पण कुणालाही या प्रश्नाचं समाधानकारक उत्तर देता आलं नाही. ही समस्या यापूर्वी लक्षातच आली नव्हती या म्हणण्यात अर्थ नाही. अगदी १९३१ मध्ये सुद्धा तत्कालीन ब्रिटिश जनगणनाधिकारी श्री. सी. एस. मुल्लन यांनी आपल्या अहवालात हे नमूद केलं होतं की, बंगाली घुसखोरांचं अतिक्रमण असंच सुरू राहिलं तर एक शिवसागर जिल्हा वगळता उर्वरित सर्व आसामात बंगाली बहुसंख्य बनण्याचा धोका आहे. खुद्द १९३१ मध्येच आसामातील बिगर-असमियांची संख्या सुमारे ५ लाख ७५ हजार एवढी प्रचंड असल्याची नोंद सरकारदरबारी उपलब्ध आहे.

केंद्र आणि राज्य सरकारांना या घुसखोरीच्या वाढत्या प्रमाणाची तपशीलवार माहिती असतानाही ही समस्या गेली ३३ वर्षे दुर्लक्षित राहिली याला खरे म्हणजे ही दोन्ही सरकारे चालविणारे काँग्रेसचे पुढारी जबाबदार आहेत. कोणत्याही बिकट समस्येला सामोरं जाण्याची Political will काँग्रेसी राज्यकर्त्यांत अभावानेच आढळली आहे, घुसखोरांची समस्या त्यापैकीच एक आहे.

१९५० मध्ये आसामात श्री. बी. आर. मेढी यांचं सरकार होतं. श्री. मेढी यांनी घुसखोरांना हाकलून लावण्यासाठी प्रयत्नही सुरू केले; परंतु काँग्रेस व मुस्लिम लीगमधील मुस्लिमनेत्यांनी या प्रयत्नाला धार्मिक वादाचे स्वरूप आणले आणि आपली 'सेक्युलर' प्रतिमा जपण्यासाठी काँग्रेसी पक्षश्रेष्ठींनी हा सारा प्रश्नच 'गालिचाखाली सरकविला.' या साऱ्या प्रयत्नात श्री. मेढी यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर सत्तेवर आलेले मुख्यमंत्री श्री. चलिहा यांनी या प्रश्नात किंचित ताठर भूमिका घेऊन घुसखोरांच्या हकालपट्टीसाठी काही पावले उचलली; परंतु ही समस्याच इतकी अक्राळ-विक्राळ होती आणि आहे की श्री. चलिहांचे प्रयत्न जवळपास अयशस्वी ठरले. काँग्रेसमधील मुस्लिमांचा एक गट घुसखोरांना हाकलल्याचे सर्व प्रयत्न हाणून पाडण्यास जणू सज्जच

होता. श्री. चलिहांवर हिंदूंना झुकते माप देण्याचा आरोप करून त्यांनी श्री. चलिहांची प्रतिमा चांगलीच डागळली. हे प्रकरण इतके वाढले की अखेर 'वस्तुस्थितीच्या निरीक्षणासाठी' तत्कालीन गृहमंत्री गुलझारीलाल नंदा यांना आसामात येणे भाग पडले. श्री. नंदा यांनी दिलेला अहवाल मात्र उल्लेखनीय आहे. श्री. नंदा यांनी म्हटले आहे की, 'पाकिस्तानातून येणाऱ्या घुसखोरांचे प्रमाण चिंताजनक असून या लोकांनी अनेक अराष्ट्रीय मंडळींना हाताशी धरून राष्ट्रविरोधी कारवाया सुरू केल्या आहेत. हे थांबवायचे असेल तर घुसखोरांना थोपविण्यासाठी परिणामकारक कारवाई अतिशय वेगाने केली पाहिजे !'

गृहमंत्री नंदा यांच्या या अहवालावर काही थातुरमातुर कारवाई सरकारने केली; पण त्याचा परिणाम झाला नाही.

आसामातील माझ्या मुक्कामात राज्य इंदिरा काँग्रेसचे एक नेते पंजाबचे माजी राज्यपाल आणि आसामचे माजी मुख्यमंत्री श्री. महेंद्र मोहन चौधरी यांचीही मी भेट घेतली. 'बंगाली घुसखोरांची समस्या इतके वर्ष दुर्लक्षित का राहिली ?' या प्रश्नाला उत्तर देताना श्री. चौधरी म्हणाले की, 'हा प्रश्न सोडविण्यासाठी ज्या ज्या मुख्यमंत्र्यांनी प्रभावी उपाय योजण्याचा प्रयत्न केला त्या त्या मुख्यमंत्र्यांची सरकारे काँग्रेसमधील 'एका गटाच्या' दबावाच्या राजकारणामुळे उलथवण्यात आली.' ही समस्या सोडविण्यासाठी १९७०–७१ मध्ये मी मुख्यमंत्री असताना राष्ट्रीय नागरिकत्वाचे एक रजिस्टर तयार करण्यासाठी मी प्रयत्न केले. आम्ही हे काम सुरूही केले होते; पण केंद्र सरकारने ते थांबविले. मी हा प्रश्न सोडवू इच्छिताच माझेच एक सहकारी शरदचंद्र सिन्हा यांनी 'दबाव गटाच्या' मदतीने बंडखोरी करून माझे सरकार पाडले व ते मुख्यमंत्री झाले.

मुख्यमंत्रिपद, नंतर राज्यसभेचे सदस्यत्व व नंतर पाच वर्षे राज्यपालपद भोगल्यानंतर श्री. महेंद्र मोहन चौधरी आसामच्या राजकारणात खरे तर आता प्रभावशून्य आहेत. इंदिरा काँग्रेसमध्ये ते असले तरी त्यांचे स्थान 'वयोवृद्ध नेत्या' इतकेच ! कदाचित त्यामुळेच इंदिरा गांधी आसामच्या या समस्येकडे दुर्लक्ष करीत आहेत व त्यांनी याआधीच आसामला भेट द्यायला हवी होती ही आणि अशी इंदिरा काँग्रेसवासीयांच्या तोंडी 'न शोभणारी' धाडसी विधानेही त्यांनी माझ्याशी बोलताना केली.

श्री. चौधरींचे सरकार पाडून सत्तेवर आलेले श्री. शरदचंद्र सिन्हा १९७२ पासून १९७८ पर्यंत सतत सहा वर्षे सत्तेवर होते. श्री. सिन्हा हे खरे राजकारणी आहेत. एकीकडे घुसखोरांची समस्या सोडविण्यासाठी आपण वचनबद्ध असल्याची भाषा करीत असताना या प्रश्नावर शक्य तितकं निष्क्रिय राहण्यात त्यांनी चांगलंच यश मिळविलं. त्यांच्या या यशाची पावती म्हणजेच सहा वर्षांत एकदाही त्यांचे सरकार पाडण्याचे प्रयत्न यशस्वी होऊ शकले नाहीत !

श्री. बी. आर. मेढी यांच्यापासून श्री. सिन्हांपर्यंत काँग्रेसच्या ३१ वर्षांच्या राजवटीत ही समस्या जाणूनबुजून दुर्लक्षिण्यात आली याचं एक कारण 'सेक्युलर' प्रतिमा जपण्याचा प्रयत्न हे जसं होतं तसंच लाखो घुसखोरांमुळे हाताशी आलेली Vote–Bank नाहीशी होऊ नये हेही होतं. १९७८ पर्यंत आसामात सतत काँग्रेसची राजवट होती याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे लाखो घुसखोर डोळे झाकून काँग्रेसलाच मते देत होते. आपल्याला सत्तास्थानी नेऊन पोहोचविणारे हे 'मायबाप मतदार' देशाबाहेर जावेत हे कोणत्या राजकारण्याला आवडेल ? परिणामतः असमियांच्या अस्तित्वाला निर्माण झालेला धोका, राज्याच्या अर्थव्यवस्थेवर पडणारा ताण, राष्ट्र-विरोधी कारवायांना मिळणारं उत्तेजन वगैरे 'क्षुल्लक' समस्यांकडे डोळेझाक करून या 'मायबाप मतदाराबद्दल' कृतज्ञतेची भावना काँग्रेसी राज्यकर्त्यांनी सतत जागती ठेवली.

आसामातील काँग्रेसी नेत्यांनी ही समस्या सतत दुर्लक्षित ठेवली; पण विरोधी पक्षांनी मात्र आपल्या ताकदीच्या स्वरूपात थोडीफार हालचाल करून या प्रश्नावर जनजागृतीसाठी प्रयत्न केल्याचं दिसून येतं. गेल्या जानेवारी महिन्यात आसामातील परिस्थितीच्या निरीक्षणासाठी जनता पक्षाचे निरीक्षक म्हणून गौहातीत आलेले श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी आंदोलनाच्या नेत्यांना हे आवर्जून सांगितलं की, माजी जनसंघीयांनी या समस्येचं गांभीर्य खूप आधी लक्षात घेतलं होतं व १९५० मध्ये आपण स्वतः या घुसखोरांबाबत लोकसभेत एक प्रश्नही विचारला होता.

आसाम प्रदेश जनता पक्षाचे उपाध्यक्ष आणि माजी जनसंघाचे एक ज्येष्ठ नेते श्री. रमेशकुमार मिश्रा यांनीही घुसखोरांच्या प्रश्नाबाबत माजी जनसंघानं केलेल्या आंदोलनाची माहिती सांगितली. त्यांच्या सांगण्यानुसार १९६०–६१ च्या सुमारास या प्रश्नावर जनसंघाने आंदोलन सुरू केले. या काळात झालेल्या जनसंघाच्या राष्ट्रीय अधिवेशनातही या प्रश्नाची चर्चा झाली होती. आधी जनसंघाने सुरू केलेल्या या आंदोलनात पुढे पुढे काही स्वतंत्र संघटनाही सामील

## दृष्टिक्षेपात आसाम

- प. बंगालशी–म्हणजेच उर्वरीत भारताशी अवघ्या ४० कि. मी. रुंदीच्या चिंचोळ्या भूभागाने जोडलेल्या ईशान्य भारतात आसाम हे सर्वांत मोठे राज्य आहे. उत्तरेस भूतान आणि अरुणाचल प्रदेश, पश्चिमेस प. बंगाल, पूर्वेस अरुणाचल, नागालँड आणि मणिपूर, आणि दक्षिणेस बांगला देश व भारतातील त्रिपुरा आणि मिझोराम हे प्रदेश या आसामच्या चतुःसीमा आहेत.
- क्षेत्रफळ–७८,५२३ चौ. कि. मी.
- लोकसंख्या–सुमारे १ कोटी ८३ लाख.
- लोकसंख्येची घनता–प्रति चौ. कि. मी. १८६.
- साक्षरतेचे प्रमाण–२८·१%.
- दरडोई उत्पन्न–रु. ८५०.
- भू–पृष्ठाचे स्वरूप— ० डोंगराळ प्रदेश–सुमारे $\frac{1}{3}$ भू-भाग. ० वनव्याप्त क्षेत्र–सुमारे $\frac{1}{3}$ भू-भाग.
- शहरे आणि निम-शहरे–एकूण ७४.
- गावे आणि खेडी–एकूण २१,९७१.
- लागवडीखालील क्षेत्र–२३ लाख हेक्टर्स.
- महत्त्वाची खनिजे–कोळसा, नैसर्गिक वायू व खनिज तेले.
- प्रमुख व्यापारी पिके–ताग, चहा आणि ऊस.

झाल्या. १९६२ मध्ये या आंदोलनाच्या सूत्रचालनसमितीच्या अध्यक्षपदी एक समाजवादी नेते श्री. मधुसूदन दास यांची निवड झाली होती. आसामात आज सुरू असलेल्या आंदोलनाच्या तुलनेत ६२ सालच्या या आंदोलनाला अगदीच किरकोळ प्रतिसाद मिळाला हे खरे असले तरी या आंदोलनामुळेच केंद्रीय नेत्यांचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले गेले व मतदारयाद्यांतील परकीयांची नावे शोधून काढण्यासाठी त्रि-सदस्यीय निवाडा मंडळे नेमली गेली.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याशी असमियांचा आलेला संबंध आणि स्वातंत्र्योत्तर इतिहास व त्या अनुषंगाने वारंवार दुर्लक्षिल्याने उग्र बनत गेलेली घुसखोरांची समस्या याचा आढावा आत्तापर्यंत घेतला. आता या आंदोलनाला असलेल्या आर्थिक मागासलेपणाच्या, उपेक्षेच्या गडद पार्श्वभूमीचा मागोवा घेत आहे.

इथे प्रारंभीच एक गोष्ट नमूद केली पाहिजे ती अशी की, आसामच्या आर्थिक आणि औद्योगिक मागासलेपणात या राज्याच्या भौगोलिक परिस्थितीचा आणि भारतीय उपखंडात भारताच्या या भागाच्या 'नाजूक' स्थानाचा मोठा वाटा आहे. या राज्याचा ⅔ भाग डोंगराळ असल्याने औद्योगिक प्रगतीला आवश्यक त्या दळणवळणाच्या सुविधा इथे उपलब्ध नव्हत्या व आजही फारशा नाहीत. एक कच्चा मालाचा मुबलक पुरवठा ही बाब सोडली तर दळणवळणाच्या सोयी, मजूर आणि बाजारपेठांची उपलब्धता, ऊर्जा साधनांची उपलब्धता इ. अनेक बाबतीत आसामातील परिस्थिती नैसर्गिकतःच प्रतिकूल आहे. शिवाय हा सर्व सीमावर्ती भाग असल्याने आणि या संबंध ईशान्य भारताला एकीकडे चीनपासून तर दुसरीकडे पूर्वीच्या पाकिस्तानकडून धोका रहात आल्याने सरकारी क्षेत्रातील महत्त्वाचे औद्योगिक प्रकल्प आसामच्या वाट्याला कधीच आले नाहीत याच कारणासाठी. खनिज तेलाचे साठे आसामात मिळूनसुद्धा पहिलं तेलशुद्धीकरण केंद्र मात्र आसामपासून दूर बिहारात बरौनीला काढण्यात आलं.

अर्थात ही दोन महत्त्वाची कारणं लक्षात घेऊनसुद्धा औद्योगिक विकासाच्या बाबतीत आत्तापर्यंत केंद्र सरकारने आसामची घोर उपेक्षा केली आहे ही बाब नाकारता येणार नाही. आसामातील नाहोरकटिया, रुद्रसागर, हुगरीजान आणि मोरान या ठिकाणच्या तेल-विहिरींमधून आज प्रतिवर्षी सुमारे ५३ लाख टन खनिज तेलाची निर्मिती होते व त्याच्या शुद्धीकरणासाठी दोन शुद्धीकरणकेंद्रेही आसामात आहेत. मुंबई हायमध्ये खनिज तेल मिळू लागण्यापूर्वी देशाच्या खनिज तेलउत्पादनात आसामचा पहिला क्रमांक होता. आसामात मिळणाऱ्या तेलाची एकूण किंमत प्रतिवर्षी रु. ८४० कोटी असताना त्यातला वाजवी हिस्सा आसामला मिळावा अशी असमियांची भूमिका असल्यास त्यात गैर नाही. आज मात्र रॉयल्टीच्या नावाखाली केवळ रु. २२ कोटी आसामच्या वाट्याला येतात व ही रक्कम अगदीच नाममात्र आहे. खनिज तेलाच्या अन्य घटकांपासून पेट्रोलियम वर्गात मोडणारी अनेक सहउत्पादने काढता येतात व त्यासाठी एक पेट्रोकेमिकल्स प्रोजेक्ट उभारण्यात यावा ही आसामची जुनी मागणी होती. आज अनेक वर्षांनंतर न्यूबोंगाईगाव परिसरात उभारणी सुरू असलेल्या या प्रोजेक्टच्या रूपात आसामची ही मागणी मान्य होत आहे. या प्रोजेक्टप्रमाणेच तेलशुद्धीकरणकेंद्रासाठीही आसामला केंद्राशी झगडावे लागले व अखेर १९५७ मध्ये ही मागणी मान्य झाली.

आसामच्या आर्थिक मागासलेपणाबाबत सांगताना पूर्वाचलीय लोकपरिषद या प्रादेशिक पक्षाचे अध्यक्ष श्री. निवारण बोरा यांनी आसामच्या तेलउत्पादनाबाबत केलेल्या दोन मागण्यांचाही उल्लेख करायला हवा. एस्सो आणि बर्माशेल या कंपन्यांच्या राष्ट्रीयीकरणानंतर केंद्र सरकार आता आसाम ऑइल कंपनी या आणखी एका तेलकंपनीचं राष्ट्रीयीकरण करणार आहे. सध्या या कंपनीत भारत सरकार आणि बर्मा ऑइल कंपनी यांचे भागभांडवल आहे. कराराची मुदत संपताच ही कंपनी संपूर्णपणे भारत सरकारच्या ताब्यात जाणार आहे. श्री. बोरा यांची अशी मागणी आहे की बर्मा ऑइल कंपनीशी असलेल्या कराराची मुदत संपताच त्या कंपनीच्या वाट्याचे भागभांडवल आसाम सरकारकडून घ्यावे व अशा तऱ्हेने कंपनीच्या नफ्यात राज्यसरकारलाही सहभागी करून घ्यावे. याशिवाय पेट्रोलियम पदार्थ व तेलाच्या विक्रीकरातील काही हिस्सा आसामला मिळावा अशीही श्री. बोरा यांची मागणी आहे. 'आम्ही देशाला तेल देतो, देश आम्हाला काय देणार?' ही श्री. निवारण बोरा यांची युक्तिवादाची पद्धत घातक असली तरी त्यांच्या पहिल्या सूचनेत व्यवहार्यता आहे यात शंका नाही.

खनिज तेलावर नाममात्र का होईना, रॉयल्टी आसाम सरकारला मिळते, चहाच्या बाबतीत मात्र काहीच मिळत नाही. देशातील ५८ टक्के चहाचे उत्पादन एकट्या आसामात होते. सुमारे साडेचार लाख मजुरांना रोजगार मिळवून देणाऱ्या या चहा उद्योगातून दरवर्षी २७० दशलक्ष किलो चहाचे उत्पादन होते व त्याची किंमत सुमारे ४०० कोटींच्या आसपास आहे. या चहाची ठोक विक्री अजूनही ब्रिटिश जमान्यापासून चालत आलेल्या लिलावपद्धतीने होत असल्याने प्रत्यक्ष ग्राहकाला चहा महाग मिळत असला तरी सरकारला कर मात्र मिळत नाही. त्यात पुन्हा या उद्योगाची मालकी अद्यापही ब्रिटिश व बंगाल्यांकडे राहिल्याने असमियांना त्यापासून फारसा लाभ होत नाही. भरीस भर म्हणून चहाउद्योगातील सुसूत्रतेसाठी काम करणारे सेंट्रल टी-बोर्ड, ५८% चहाचे उत्पादन करणाऱ्या आसामपासून दूर कलकत्त्यात स्थापण्यात आले आहे. थोडक्यात म्हणजे भूगोलाच्या पुस्तकात उल्लेख असण्यापलीकडे आपल्या प्रांतात सर्वाधिक चहाचे उत्पादन होते, याचा खुद्द असमि-

यांना फारसा फायदा नाही. ही परिस्थिती बदलायची असेल तर 'आसाम चहा महामंडळ' ह्या राज्यसरकारच्या उपक्रमाकडे ६०% चहा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करून तो सोपविला पाहिजे' अशी श्री. निवारण बोरा यांची मागणी आहे.

जी गोष्ट चहाची तीच कागदउद्योगाची. कागदाच्या लगद्यासाठी आवश्यक तो कच्चा माल आसामात मोठ्या प्रमाणावर मिळतो; पण प्रत्यक्ष कागदकारखाने मात्र आसामात नाहीत. 'आमच्याच कच्च्या मालाच्या बळावर परप्रांतात बनलेला कागद त्यावर वाहातूक-खर्च वगैरे देऊन आम्हाला खरेदी करावा लागतो' अशी असमियांची तक्रार आहे. आसामच्या जंगलात टिकवुड आणि प्लायवुड मोठ्या प्रमाणात मिळते; पण या लाकडाच्या वखारी मात्र बंगाल्यांच्या ताब्यात आहेत व त्यामुळेच प्लायवुड-उद्योगाच्या राष्ट्रीयीकरणाचा असमियांचा आग्रह आहे.

तेलाबरोबर मिळणारा नैसर्गिक वायूही आसामात मोठ्या प्रमाणावर मिळतो; पण आसामला त्यापासून काहीही फायदा होत नाही. या नैसर्गिक वायूवर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा नसल्यामुळे दररोज सुमारे ३० दशलक्ष चौरस फूट नैसर्गिक वायू अक्षरशः वाया जातो. आसामातील सध्याची विद्युतटंचाई पाहता या नैसर्गिक वायूपासून वीजनिर्मिती करणे कठीण नाही. प. बंगालमध्ये दर माणशी विजेचा खप ११३ किलोवॅटस आहे तर आसामात तो फक्त १० किलोवॅट्स आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी खरे तर नवी विद्युतकेंद्रे स्थापण्याची गरज होती; पण केंद्र सरकारने या प्रकरणी सतत दुर्लक्षच केल्याने १९६४ नंतर आजतागायत आसामच्या विद्युत्‌उत्पादनात फरक पडलेला नाही.

रेल्वेच्या बाबतीतही आसाम खूपच मागे आहे. प्रत्येक एक हजार कि. मी. मागे १८ कि. मी. अशी लोहमार्गाची राष्ट्रीय सरासरी असताना आसामात हे प्रमाण ११ कि. मी. एवढे कमी आहे. आसामातील तेलउत्पादनाचा अभ्यास करण्यासाठी १९६९ मध्ये नेमलेल्या नेगी अभ्यास-गटाने दुलियाजानपर्यंत ब्रॉडगेज रेल्वेची शिफारस केली असताना १९५० नंतर आजतागायत बोंगाईगावच्यापुढे आसामात ब्रॉडगेज रेल्वे आलेली नाही. किमानपक्षी गौहातीपर्यंत तरी ब्रॉडगेज मार्ग टाकून गौहत्तीचे थेट दिल्लीशी नाते जोडण्याची आसामची मागणी आहे व ती खचितच न्याय्य आहे. सबंध उत्तर-पूर्व सीमा रेल्वेचे मुख्यालय गौहातीस आहे हा असमियांच्या नशिबाचा भाग मानला तरी तेवढे पुरेसे नाही. कारण आजही या रेल्वेत ९०% कर्मचारी बिगरअसमिया आहेत.

या सर्व आर्थिक दुरवस्थेमुळे आसामात सुशिक्षित बेकारांचे प्रमाण अन्य राज्यांच्या तुलनेत सर्वात जास्त आहे. अनधिकृत सूत्रांकडून राज्यात आज सुमारे १५ लाख व्यक्ती बेकार असल्याचे सांगितले जाते. या आकड्यातील अतिशयोक्ती लक्षात घेऊनसुद्धा बेकारीची समस्या आसामात अधिकच भीषण आहे हे मान्य करावे लागेल. त्यातही सुशिक्षित बंगाली लोकांच्या तुलनेत असमियांमधील बेकारीचे प्रमाण अधिकच मोठे आहे.

एवढे सगळे कमीच म्हणून की काय ब्रह्मपुत्रेच्या पुरांमुळेही आसामला प्रतिवर्षी काही लक्ष रुपयांची वित्तहानी सोसावी लागते. सरासरी पावणेचार मैल रुंदीच्या या ब्रह्मपुत्रेच्या महापुरांपासून आसामचे नुकसान वाचविण्यासाठी १९७० मध्ये ब्रह्मपुत्र पूरनियंत्रण आयोग नेमण्यात आला होता; पण पुरापुढे या आयोगाच्या सर्व योजनांची आजतागायत चक्क वाताहात झाली आहे.

हे भयानक आर्थिक मागासलेपण, ऐतिहासिक काळापासून असमियांच्या मनात निर्माण झालेला न्यूनगंड, असमिया-बंगाली संघर्ष आणि स्वार्थी राज्यकर्त्यांनी सतत दुर्लक्षिल्याने वाढत गेलेली आणि आज भीषण बनलेली परदेशी घुसखोरांची समस्या ही सारी आसामातील सध्यांच्या आंदोलनांची पार्श्वभूमी आहे. प्रत्यक्ष आंदोदनपर्वाविषयीचं विवेचन पुढच्या लेखांकात.

[क्रमशः]


**मान्यता पावलेला चरित्रग्रंथ**

# टॉलस्टॉय – एक माणूस


**दुसरी आवृत्ती । लेखिका : सुमती देवस्थळे । मूल्य : पंचावन्न रुपये**

**राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०**

PADMAJA/M

# अक्षय सुखाच्या चिरंतन ओळी





महाबँकेच्या आवर्त ठेव योजनेच्या तुमच्या
पासबुकाच्या प्रत्येक पानावरील या ओळी म्हणजे
तुमच्या भविष्यातील अक्षय सुखाची ग्वाहीच !
या योजनेमध्ये तुम्ही दरमहा पांच रुपयांपासून
बचत करु शकता.

**महाबँक आवर्त ठेव योजना म्हणजे बचतीचा उत्तम मार्ग !**

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कार्यालय : पुणे

बँकिंग सेवा
व्यक्तिगत जिव्हाळा